सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. २२ नोव्हेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २२६ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### तोरंगण घाटात अपघात

**नाशिक :** मोखाडा त्रंबकेश्वर रस्त्यावरील तोरंगण घाटात एक आयशर ट्रकचा मोठा अपघात झाला असून यामध्ये प्रवासी असलेल्या सुभाष दिवे (२८) मु.हाडे जव्हार याचा जागीच मृत्यू झाला आहे तर ३० हून अधिक जखमही झाले. हे सर्वजण मजुरीच्या शोधात निघाले होते. गंभीर जखमींना उपचारासाठी त्रबकेश्र्वर आणि नाशिक जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.तर काही जखमींवर मोखाडा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यातील काहींची स्थिती नाजूक असल्याचे सांगण्यात येत आहे.

### मुंबईत भाजपचं 'अब की बार १०० पार'

**मुंबई :** मुंबईत भाजपनं अब की बार १०० पारचा नारा दिलाय. भाजपनं केलेल्या अंतर्गत सर्वेक्षणात मुंबई महानगर पालिकेत भाजप १०० हून अधिक जागा जिकण्याचा अंदाज आहे. भाजपनं केलेल्या या सर्वेक्षणात महायुतीला बहुमत मिळणार असल्यचा निष्कर्ष समोर आलाय. ठाकरे आणि काँग्रेसच्या काही जागांवर ही भाजप उमेदवार विजयी होत असल्याची माहिती या अंतर्गत सर्व्हेतून समोर आली आहे.

### आंदेकर टोळीची काढली धिंड

**पुणे :** आंदेकर टोळीतील प्रमुख गुंड कृष्णा, अभिषेक आणि शिवराज आंदेकरची पोलिसांनी काढली धिंड. घरझडतीच्या निमित्ताने नाना पेठ, गणेश पेठेत फिरविले. पुण्यात आंदेकर टोळीने गेले काही महिन्यात शहरात धुमाकूळ घातला आहे. माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या हत्येनंतर बांदेकर टोळीने जवळपास तीन खून केले आहेत.

# नगरसेवक पदासाठी १ कोटीचा लिलाव?

■ राजगुरुनगरधील धक्कादायक प्रकार । महिला राखीव जागेसाठी २२ लाखांची बोली

**पुणे :** सध्या राज्यात निवडणुकीचे पडघम वाजू लागले असून सर्व राजकीय पक्ष त्याच तयारीत व्यस्त आहेत. मात्र याचदरम्यान पुण्यात धक्कादायक प्रकार घडल्याचे समोर आले आहे. पुण्यातील राजगुरूनगर नगरपरिषद निवडणुकीत ही घटना घडल्याची चर्चा आहे. तिथे एका प्रभागात नगरसेवक पदासाठी गावकऱ्यांनी चक्क लिलाव केल्याचं बोललं जात आहे. राजगुरुनगर नगरपरिषदेच्या नगरसेवक पदाच्या जागेसाठी चक्क लिलाव झाल्याची चर्चा असून सर्वसाधारण जागेसाठी एक कोटी दोन लाख रुपये तर महिला राखीव जागेसाठी २२ लाख रुपयांची बोली लागल्याची चर्चा राजगुरूनगरमध्ये सुरु आहे. यामुळे मोठी खळबळ माजली आहे. पण यावर सत्ताधारी आणि विरोधक दोन्ही ही मूग गिळून गप्प आहेत. कोणीच काही बोलत नसल्याने साटलोटं झाल्याच्या चर्चेला आणखी हवा मिळाली आहे.

अनेक उमेदवार उभे राहून पैसे खर्च करण्यापेक्षा निवडणूक



बिनविरोध करण्यासाठी गावकऱ्यांनी हा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. राजगुरुनगर परिषदेच्या एक नंबर प्रभागामधील गावकऱ्यांनी वेगळा निर्णय घेतला. निवडणुकीत अनेक उमेदवार उभे राहणार आणि त्यासाटी पैसे खर्च करणार, त्यापेक्षा प्रभागाची निवडणूक बिनविरोध करू, असे त्यांनी ठरवल्याचे बोलले जात आहे. पण या निवडणुकीत बिनविरोध निवडीसाठी कोणी माघार घ्यायला तयार होत नव्हतं. अखेर यावर गावकऱ्यांनीच अजब तोडगा काढला.

त्यांच्या प्रभागातून सर्वसाधारण व महिला राखीव जागेवरचे दोन्ही उमेदवार लिलावाद्वारे निवडायचे. जे उमेदवार या पदासाठी जास्त बोली लावतील, त्यांना इतर सर्व उमेदवारांनी पाठिंबा देऊन आपापले उमेदवारी अर्ज मागे घ्यायचे, असे ठरलं. एवढंच नव्हे तर बोलीतून जी रक्कम हाथी येईल, त्याने शहराचा विकास करायचा असा एकमुखी निर्णय घेण्यात आल्याचे समजते. आणि आश्चर्य म्हणजे तसंच घडलं ना राव.. 'गाव करील ते राव काय करील', या म्हणीप्रमाणे गावाच्या विरोधात जायची हिंमत कोणताच उमेदवार दाखवू शकला नाही. सर्वांनी प्रस्ताव मान्य केला.

या लिलावासाठी गावच्या मंदिरात सर्व उमेदवार आणि गावकरी जमले होते आणि तिथेच हा लिलाव पार पडला असे समजते. एका प्रभागात पुरुषांच्या जागेसाठी १ कोटी तीन लाखांची बोली लागलीय अन् महिलांच्या जागेसाठी २२ लाखांची बोली लागली, अशी माहिती समोर आली आहे.

सर्वांत जास्त बोली लावणारे दोन्ही उमेदवार आता या प्रभागाचे नगरसेवक आणि नगरसेविका होण्याची शक्यता आहे. पण त्यासाठी ठरल्याप्रमाणे बाकीच्या उमेदवारांनी माघार घेणे आवश्यक आहे. त्यामुळे हा सर्व बोलीचा प्रकार प्रत्यक्षात येणार की नाही, हे माघारीनंतरच स्पष्ट होईल.

# पुण्यातही चिमुकलीवर अत्याचार

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील ओतूर गावात ऊसतोड मजूर कुटुंबातील सात वर्षीय चिमुकलीवर अमानुष अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना घडली. पीडीत लहानगीवर अत्याचार करणारा तरूण त्याच वस्तीत राहणारा आहे. यामुळे परिसरात संतापाची लाट पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संध्याकाळी मुलगी घराबाहेर खेळत असताना आरोपीने तिला जबरदस्तीने एका निर्जन जागी नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. मुलगी घाबरून घरी परतल्यानंतर तिने आई-वडिलांना याबाबत सांगितली. मुलीने आरोपीचे नाव स्पष्टपणे सांगितल्याने पालकांनी तात्काळ ओतूर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. देवीदास रोहीदास गर्जे असे आरोपीचे नाव असून तोसुद्धा ऊसतोड कामगार आहे. तक्रार दाखल केल्यानंतर ओतूर पोलिसांनी त्वरित कारवाई करत आरोपी देवीदास गर्जेला अटक करून पॉक्सो कलमांन्वये देविदास गर्जे याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक संजय साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन शिंदे पुढील तपास करीत आहेत.




# अर्ज मागे घेण्यासाठी महिला उमेदवाराला ठेवले डांबून

**त.भा. वृतसेवा**

**बिलोली, दि. २१ नोव्हेंबर :** बिलोली नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीचा आज नामनिर्देशन पत्र माघार घेण्याचा शेवटचा दिवस असतांना नाट्यमय घडामोडी घडल्या. मराठवाडा जनहित पार्टीचे प्रमुख नगराध्यक्ष पदाचे उमेदवार संतोष कुलकर्णी यांनी प्रभाग क्र.२ ब मधील विजयालक्ष्मी बालाजी हरणे या राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) महिला उमेदवाराला उमेदवारी माघार घेण्यासाठी दबाव आणून त्या महिला उमेदवाराला डांबून ठेवल्यामुळे नगर परिषद कार्यालयात सकाळी राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि मराठवाडा जनहित पार्टी मध्ये राडा झाला आहे.

**बिलोली येथील धक्कादायक प्रकार**

मराठवाडा जनहित पार्टीचे प्रमुख संतोष कुलकर्णी यांच्या सौभाग्यवती मैथिलीताई कुलकर्णी हे प्रभाग क्र.२ ब सर्वसाधारण महिला प्रवर्गातुन निवडणुकीसाठी थांबल्या आहेत. त्याच प्रभागात त्याचे प्रतिस्पर्धी विजयालक्ष्मी बालाजी हरणे या महिला उमेदवार राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) कडून निवडणुकीसाठी थांबल्या आहेत. आज दि.२१ नोव्हेंबर नामनिर्देशन पत्र माघार घेण्याचा शेवटचा दिवस असल्यामुळे प्रतिस्पर्धी उमेदवार विजयालक्ष्मी हरणे या महिला उमेदवाराला उमेदवारी अर्ज माघार घेण्यासाठी दबाव आणून तिला डांबून ठेवल्याची माहिती उघड होताच मराठवाडा जनहित पार्टी आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात खडाजंगी झाल्यामुळे नगर परिषद कार्यालयाच्या परिसरात दिवसभर तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या महिला उमेदवार विजयालक्ष्मी हरणे यांना ज्या घरात डांबून ठेवण्यात आले होते. तिथुन त्या महिला उमेदवार व तिच्या पतीला पोलीस प्रशासनाच्या संरक्षणात डांबून ठेवलेल्या ठिकाणाहुन सुखरुप बाहेर काढण्यात आले असून ती महिला उमेदवार अत्यंत भयभीत झाल्यामुळे तिचा प्राथमिक उपचार करण्यात आला असुन तिची तब्येत ठीक असल्याची माहिती मिळाली.

एकंदरीत या नाट्यमय राजकीय घडामोडीमुळे दिवसभर शहरात तणावाचे वातावरण होते.

# समृद्धी महामार्ग मराठवाड्याच्या विकासाचा खरा 'गेमचेंजर'

**त.भा. वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २१ :** मराठवाडा चेंबर ऑफ इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरच्या वतीने आयोजित सहाव्या सीईओ कॉन्क्लेव्ह २०२५ मध्ये मराठवाड्याच्या औद्योगिक विकासाला गती देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय आणि घोषणांची माहिती समोर आली. Marathwada Resilient Relevant Ready या परिषदेच्या थीमखाली उद्योग नेते, स्टार्टअप संस्थापक, गुंतवणूक तज्ज्ञ आणि धोरणकर्त्यांनी आपल्या भूमिका मांडल्या.

महाराष्ट्र शासनाचे गुंतवणूक आणि धोरण सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी भाषणात राज्यातील गुंतवणूक वातावरण, राष्ट्रीय स्पर्धा आणि मराठवाड्याची क्षमता यावर भर दिला. समृद्धी महामार्ग हा मराठवाड्याच्या औद्योगिक नकाशयातील सर्वात निर्णायक घटक ठरणार असून या महामार्गालगत १२ नवीन ड्रायपोर्ट उभारले जाणार आहेत.

तसेच १००० एकरांचा विशाल बल्क ड्रॅग पार्क स्थापन होणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. जालना येथील ड्रायपोर्ट पुढील सहा महिन्यांत पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आहे. धवसे यांनी राज्यात २०२५ मध्ये तब्बल ३० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूक प्रस्तावांची नोंद झाल्याचे सांगितले. महाराष्ट्राची आर्थिक वाढ १०.२ टक्के असून ६५ टक्के तरुण लोकसंख्या ही राज्याच्या जागतिक स्पर्धेत मोठी ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्य ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत असून त्या वाटचालीत छत्रपती संभाजीनगर ३० अब्ज डॉलरचे योगदान देऊ शकतो असे त्यांनी स्पष्ट केले. मराठवाड्याच्या औद्योगिक क्षमतेचा सर्वसमावेशक अभ्यास अहवाल सादर करण्याचे आवाहन त्यांनी सीएमआयएला केले.

# उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या पदरी दिल्ली दरबारीही निराशाच

**मुंबई :** परस्परांच्या पक्षामध्ये सुरू असलेल्या फोडाफोडीमुळे सत्ताधारी महायुतीमधील वाद चांगलाच पेटला आहे. भाजपकडून



सुरू असलेल्या इनकमिंगमुळे नाराज असलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली.

या भेटीत एकनाथ शिंदे यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह भाजप नेत्यांची तक्रार केल्याची माहिती समोर आली होती. अमित शाहांनी एकनाथ शिंदे यांना सबुरीचा सल्ला दिला असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राज्यात मंगळवारी भाजप आणि शिवसेनेमध्ये झालेल्या वादानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बुधवारी तडकाफडकी दिल्लीत दाखल झाले. राज्यात भाजप आणि शिवसेना यांच्यातील संघर्ष वाढलेला असताना शिंदे दिल्लीमध्ये पोहचले. दिल्लीत पोहचल्यानंतर त्यांनी अमित शाहांची निवासस्थानी भेट घेतली. या दोघांमध्ये जवळपास ५० मिनिटे चर्चा झाली. या भेटीत भाजपकडून शिवसेना शिंदे गटाला हतबल करण्याच्या प्रयत्नांसह काही मुद्द्यांवर चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले. दिल्लीत एकनाथ शिंदे यांनी अमित शाह यांची भेट घेतली होती. या भेटीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एकनाथ शिंदे यांना सबुरीचा सल्ला दिला असल्याची माहिती सूत्रांनी दिली.




तुमचे पैसे, तुमचा हक्क!
भारत सरकारचा उपक्रम



प्रत्येक LIC पॉलिसीमध्ये काळजी, सुरक्षितता, उज्ज्वल भविष्याचे आश्वासन असते. कारण कधीकधी आयुष्य बदलते, मग ते नवीन घर असो, नवीन शहर असो किंवा नवीन सुरुवात असो. तुम्ही कुठेही गेलात तरी, तुमच्या कष्टाचे पैसे नेहमीच तुमच्याकडे परत येतील.

तुमची अन्क्लेम्ड रक्कम 3 टप्प्यांत मिळवा:

- www.licindia.in ला भेट द्या
- पॉलिसीधारकांच्या अन्क्लेम्ड रकमेवर क्लिक करा
- तपशील प्रविष्ट करा

किंवा क्युआर कोड स्कॅन करा

LIC/R1/2025-26/25/Mar

LIC मोबाइल ॲप डाउनलोड करा LIC digital | भेट द्या: licindia.in | कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827 | आमचा वॉट्सॲप नं. 8976862090 बोला 'Hi'

LIC भारतीय आयुर्विमा महामंडळ LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
आयुष्यभराची साथ, आयुष्यानंतरही.

अधिक माहितीसाठी तुमचे विमा एजंट/तुमच्या नजीकच्या एलआयसी शाखेबरोबर संपर्क साधा/www.licindia.in वर जा

आम्हाला फॉलो करा: LIC India Forever | IRDAI Regn No.: 512

भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसींची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियमची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग घेत नाहीत, अशा प्रकारचे दुरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## लातुरात २०० किलो प्लास्टिक पिशव्या जप्त

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** लातूर शहर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने शहरातील बाजारपेठेतील ११० दुकानांतून तब्बल २०० किलो प्लास्टिक पिशव्या जप्त केल्या आहेत. व्यापाऱ्यांकडून १६ हजार ५०० रुपयांचा दंडही वसूल केला.

लातूर मनपाच्या स्वच्छता विभागाचा पदभार नवनियुक्त उपायुक्त वसुधा फड यांनी स्वीकारला असून त्यांनी आपल्या कामालाही सुरुवात केली आहे. आगामी काळात लातूर शहरात प्लास्टिक बंदीची मोहीम अधिक गतिमान करण्यावर आपला भर असणार असल्याचे वसुधा फड यांनी आपल्या कामगिरीतून दाखवून दिले आहे. त्या मोहिमेचा एक भाग म्हणून गुरुवारी शहरातील दुकानदार, विक्रेते, फुल विक्रेते , भाजी विक्रेते अशा एकूण ११० विक्रेते – व्यापाऱ्यांकडून २०० किलो प्लास्टिक पिशव्या जप्त करून त्यांच्याकडून साडे सोळा हजारांचा दंड वसूल करण्यात आला.

प्लास्टिक पिशव्यांच्या वापराने होणाऱ्या कचऱ्याचे विघटन होत नाही. त्यामुळे शहराच्या प्रदूषणात कमालीची वाढ होते. शहरात भविष्यात प्लास्टिक बंदीची मोहीम अधिक गतिमान करणार असल्याचे वसुधा फड यांनी सांगितले.



# माजी उपमहापौरांच्या प्रभागातच घाणीचे साम्राज्य..!






**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** लातूर शहरातील जवळपास प्रत्येक प्रभागात मागच्या अनेक महिन्यांपासून नागरी सुविधांचा प्रचंड अभाव आहे. मनपाचा कारभार प्रशासकांच्या हाती असल्याने सामान्य नागरिकांच्या समस्यांची सोडवणूक करण्याऐवजी त्यांनी अन्य कामांना प्राधान्य दिल्याने येणाऱ्या मनपा निवडणुकीत उमेदवार म्हणून प्रभागात फिरणाऱ्या संभाव्य नगरसेवकांची खरी कसोटी लागणार आहे. शहराचे माजी उपमहापौर तथा प्रभाग क्रमांक १ चे माजी नगरसेवक देविदास काळे यांच्या प्रभागातील महात्मा गांधी शाळेच्या मागच्या भागातील उंट अड्डा, सूळ गल्ली परिसरात घाणीचे साम्राज्य पाहायला मिळाले. या भागातील असंख्यमतदार लोकप्रतिनिधींच्या आणि प्रशासनाच्या ढिम्म कारभाराच्या निषेधार्थ चक्क मनपा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याच्या मानसिकतेत आहेत.

लातूर शहराकडे जरी मराठवाड्यातील सर्वाधिक वेगाने विकसित होत जाणारे शहर म्हणून पाहिले जात असले तरी वास्तव फार वेगळे आहे. हे प्रत्यक्ष शहराच्या विविध भागात फेरफटका मारल्यानंतर पाहायला मिळते. प्रत्येक प्रभागातील-वॉर्डातील नागरिक विविध प्रलंबित समस्यांनी अक्षरशः वैतागले आहेत. मनपातील मागच्या तीन वर्षांहून अधिक काळच्या प्रशासक राजमध्ये नागरी समस्यांकडे सपशेल दुर्लक्ष्य झाल्याचे अनेक बाबींवरून निदर्शनास येते. लातूर शहराच्या प्रभाग १-१ चे माजी नगरसेवक, माजी उपमहापौर देविदास काळे यांच्या वॉर्डातील या भागातील नागरिकांनी मावळत्या पालिकेतील सदस्यांसह प्रशासनाबद्दल तीव्र शब्दात संताप व्यक्त केला.

तत्कालीन नगरसेवकाकडे आपल्या अडचणी घेऊन गेले असता नागरिकांना ते तुम्ही पैसे घेऊन मतदान केलेय. आता कशाला आमच्या दारात येताय? अशा शब्दात बोलत असल्याचा आरोपही संतप्त महिला वर्गातून केला गेल्याचे ऐकावयास मिळाले. या गल्लीत गटारी

### असंख्य मतदार मनपा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याच्या मानसिकतेत

सुद्धा व्यवस्थित बांधल्या गेलेल्या नाहीत. गटारीत कचरा-घाण काढल्यानंतर ती भरून न नेता तेथेच ठेवली जाते. ती घाण परत गटारात जाते आणि गटारी तुंबतात. कचरा घेऊन जाणाऱ्या घंटा गाडीवाल्याला तो कचरा घेऊन जण्यास सांगितले असता, तो तुमच्या गल्लीत गाडी यायला रस्ता नाही, आम्ही कचरा कसा नेणार? अशी उत्तरे देतात, अशा शब्दात नागरिकांनी आपल्या व्यथा मांडल्या. अस्वच्छतेमुळे गटारीतील घाण अक्षरशः रस्त्यावर येते. ती घाण निचरायलासुद्धा तेथे जागा नाही. त्यामुळे घाणीचे साम्राज्य, डासांचा वाढता प्रादुर्भाव अशा परिस्थितीत एखाद्या झोपडपट्टीपेक्षाही बत्तर अवस्थेत येथील नागरिकांना दिवस कंठावे लागत आहेत. मैला वाहून नेणाऱ्या भुयारी गटाराचेचेंबरही अगदी दोन तीन फूट खोलीचे बनवले गेले असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या. तसेच चेंबरमधून मैला वाहून जाण्यासाठी सुद्धा उतरत्या क्रमाऐवजी चढत्या क्रमाने रस्ता केला गेला असल्याचे दिसून आले. त्यामुळे या गल्लीतील अनेक चेंबर पावसाळ्यात भरल्यानंतर आतील सर्व घाण पाणी, मैला रस्त्यावर पसरतो, नागरिकांना त्यावेळी जगणे मुश्किल होते, अशा संतप्त प्रतिक्रियाही ऐकायला मिळाल्या.

या गल्लीत फेरफटका मारल्यानंतर असे लक्षात येते की, येथे चार चाकी गाडी सोडा, साधा ऑटोरिक्षाही येऊ शकत नाही. कारण रस्त्यावर उभारण्यात आलेले भुयारी गटारांचेचेंबर रस्त्याच्या उंचीपेक्षा अधिक बनले आहेत. म्हणजे या गल्लीतील रस्त्याच्या कामाचा दर्जा काय असेल ते सुजाण नागरिकांच्या लक्षात येईल. नळाला येणारे पाणीसुद्धा अधून मधून नव्हे तर नेहमीच खराब, दुर्गंधीयुक्त येते. पाण्यातून अनेकदा अळ्या, गेचवे येतात, असे या भागातील महिला भगिनींनी सांगितले. असे पाणी पिण्यासाठी नव्हे पण सांडपाणी म्हणून उपयोगात आणण्याच्या लायकीचे नसल्याचे सांगण्यात आले.

या बाबी अनेकदा मनपा प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्नही केला. पण कोणीही आतापर्यंत त्याकडे गांभीर्याने पाहिले नाही. त्यामुळे या परिसरातील नागरिक होऊ घातलेल्या आगामी मनपा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार घालण्याच्या मानसिकतेत असल्याचे सांगितले गेले.विकास कामांची मागणी केली की नगरसेवक मतदानासाठी पैसे दिल्याचे बोलून दाखवतात. त्यामुळे अनेकदा प्रत्यक्षात पैसे कोणत्या मतदारांना दिलेतत्याची यादी द्या, अशी मागणी करूनही माजी नगरसेवक ती यादी देत नसल्याचा आरोप रहिवाशांनी केला.

याच १ नंबर प्रभागातून यशोदा चित्रमंदिर, अंबाजोगाई रोडकडे जाणारा रस्ता आहे. या रस्त्यावरील वाहतुकीची वर्दळ मागच्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या भागातील रस्त्यांची अवस्थाही अतिशय बिकट झाली आहे. या भागातील रस्त्याकडे पाहिले असता ते महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते असल्याचे अजिबात वाटत नाही. हा रस्ता जणू एखाद्या ग्रामीण भागातील रस्ता असल्यासारखे दिसते. या रस्त्यावरही आता नेहमीच म्हणजे काहीमिनिटा-मिनिटाला वाहतुकीची कोंडी होत असल्याचे पाहायला मिळाले.

मुख्य रस्त्यावरून जाण्यापेक्षा नागरिक-वाहन धारक या मधल्या रस्त्याने जाण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे या मार्गावरही आता शहरातील अन्य मार्गाप्रमाणे वाहतुकीची कोंडी होताना दिसतेय. बालाजी मंदिराकडून यशोदा चित्रमंदिरकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणही झाल्याने अगोदरच छोटा असणारा हा रस्ता आणखीनच छोटा झाल्याचे दृष्टीपथास येते.

मनपा निवडणुकीला अद्याप काहीसा अवधी आहे. किमान माजी नगरसेवक आणि इच्छुकांनी येथून तरी नागरिकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी तत्पर राहावे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# आ.देशमुख यांनी साधला नागरिकांशी संवाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव

### समस्या निवारणासाठी अधिकाऱ्यांना केल्या सूचना

देशमुख यांनी शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहर व जिल्हाभरातून आलेल्या नागरिकांच्या भेटी घेतल्या. यावेळी त्यांनी विविध संस्थांचे पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि नागरिकांशी संवाद साधला. आमदार देशमुख यांनी आलेल्या नागरिकांच्या अडीअडचणी व समस्या समजून घेतल्या आणि त्यांच्या निमंत्रणांचा स्वीकार केला. तसेच, संबंधित अधिकाऱ्यांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी तात्काळ सूचना केल्या.



या भेटीदरम्यान माजी महापौर दीपक सूळ, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावने, सचिव अरविंद पाटील, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, रेणा सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन सर्जेराव मोरे, गणेश एस. आर. देशमुख, अशोक अग्रवाल, व्यकंट शिंदे, पत्रकार बशीर शेख, यशपाल कांबळे, जितेंद्र स्वामी, व्यकंट जाधव, केतन हलवाई, संजय वर्मा, पत्रकार नेताजी जाधव, दिनेश व्यास, डॉ. निखिल व्यास राजकुमार कत्ते, गोविंद देशमुख, माधव सोळुंके, आनंद माने, राम साळुंखे, माधवराव मुळे, सुनंदा मोठे, हनमंत पवार, जयश्री पाटील, बिभीषण सांगवीकर, संजय शिंदे, भीमाशंकर ढेकणे, सिकंदर पटेल, अभिषेक पतंगे, दिनेश गोजमगुंडे, व्यंकटेश पुरी,बी.एस. पवार, गोपाळ शिंदे, उदय पाटील, आकाश भगत, सुभाष घोडके, प्रा.बालाजी वाघमारे, कृष्णा थोरमोठे, वेदप्रकाश मलवाडे, सुधीर पाटील, मंजीत नरहरे, दीपमाला चंदनशिवे आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

# जिल्हा गुणवत्ता कक्ष समिती सदस्य निवडीबद्दल प्राचार्य शिंदेंचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** लातूर येथील प्राचार्य गोविंद शिंदे यांची जिल्हा गुणवत्ता कक्षाच्या समिती सदस्यपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. त्यांची ही निवड शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता सुधारण्यासाठी ही निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल विचावंत ग्रुपच्यावतीने प्राचार्य डॉ.आर. एस. अवस्थी, कमलाकर कदम, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, बापूसाहेब गोरे, प्रा.जीवन जाधव यांच्याहस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या समितीच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता सुधारण्यासाठी जिल्हा गुणवत्ता



कक्ष समितीचे कार्य असणार आहे.

शाळा व्यवस्थापन आणि कार्यक्रम सल्लागार यांसारख्या समित्यांची रचना आणि कार्यपद्धती सुधारण्यासाठी मदत होणार आहे. या समित्यांमध्ये शैक्षणिक दर्जा सुधारणे, गुणवत्ता वाढवणे आणि धोरणात्मक बदल घडवून आणणे यांसारख्या कामांवर लक्ष केंद्रित केले जाते. त्याचबरोबर शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी मार्गदर्शन करणे. विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविणे बाबत धोरण ठरविण्यात महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.

# मालेगाव चिमुकली अत्याचार, हत्या प्रकरणी आरोपीस फाशीची शिक्षा द्या

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** मालेगाव (जि. नाशिक) येथील मौजे डोंगराळे गावात सुवर्णकार समाजातील केवळ तीन वर्षांच्या चिमुकली कु. यज्ञा जगदीश दुसाने हिच्यावर झालेल्या क्रूर अत्याचारानंतर निर्घृण हत्या झाल्याने संपूर्ण समाजमन सुन्न झाले आहे. या भीषण घटनेनंतर सर्वत्र संतापाची लाट उसळली असून दोषींना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर लातूर जिल्हा सोनार समाज असोसिएशन, लातूर यांच्या वतीने मा. जिल्हाधिकारी, लातूर यांना निवेदन देण्यात आले.

### सुवर्णकार समाजात संतापाची लाट

संघटनेने आपल्या निवेदनात म्हणटले आहे कीं निष्पाप बालिकेला न्याय मिळावा आणि दोषींना फाशीची शिक्षा व्हावी, हीच खरी श्रद्धांजली ठरेल, असे नमूद केले. सदर गुन्हा फास्टट्रॅक न्यायालयात वर्ग करून खटला तातडीने चालवावा, दोषींना फाशीची शिक्षा होण्यासाठी पाठपुरावा संबंधितांकडे तातडीने करावा, अशा घृणास्पद घटनांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्या, अशा मागण्या करण्यात आल्या असून सदर निवेदन लातूर जिल्हा सोनार समाज असोसिएशनचे अध्यक्ष राजाभाऊ हरिभाऊ बोकन यांच्या नेतृवाखाली जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

यावेळी भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष ओमअप्पा धरणे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष ॲड. गणेश गोमचाळे, तालुका अध्यक्ष राहुल भुतडा, समाजाचे गजेंद्र बोकन, शिवसेनेचे आकाश बजाज, गणेश बेद्रे, पुष्कर उपाध्याय आदी मान्यवर उपस्थित होते.

# राजीव गांधी चौकातून बॅग लंपास

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** लातूर शहरातील राजीव गांधी चौक परिसरातील एका हॉटेलमधून अज्ञात चोरट्याने रोख रक्कम आणि महत्वाची कागदपत्रे असलेली बॅग लंपास केल्याची घटना घडली आहे. लातूर शहरातील नागरिक विजयकुमार ब्रॉले हे राजीव गांधी चौकात एका हॉटेलमध्ये आपली बॅग बाजूला ठेवून नाश्ता करत होते. अज्ञात चोरट्याने रोख रक्कम व महत्वाची कागदपत्रे असलेली बॅग पळवली. यप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## लातुरात टिपू सुलतान जयंती साजरी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** लातूर शहरातील बालाजी नगर परिसरात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रभाग अध्यक्ष विकास कामबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहीद टिपू सुलतान यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

विकास कांबळे यांच्या हस्ते टिपू सुलतान यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष समीर शेख, राजदार पठाण, हनीफ पठाण, आनंद सोनवणे, नवाब शेख, अमोल गायकवाड, संतोष जाधव, महेबूब शेख, सत्तर शेख यांसह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# लातूरमध्ये ५ लाख २० हजारांचा गुटखा जप्त




**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाने सुरू केलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने कार्यवाही करत राज्य शासनाने प्रतिबंधित केलेले तंबाखूजन्य पदार्थ (गुटखा) अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या एकास पकडले. त्याच्याकडून ५ लाख २० हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटख्याचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत स्थानिक गुन्हे शाखेकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, चाकूर तालुक्यातील रोहिणा ते बोथी रोडमार्गे पांढरी स्विफ्ट डिझायर कार क्रमांक एमएच ०५ - ए एक्स ९६१० मधून प्रतिबंधित केलेला गुटख्याची वाहतुक केली जात असल्याची माहिती मिळाली. त्याप्रमाणे पोलिसांनी बोथी तांडा-रोहिणा रोडवर सापळा लावू कार अडवून झडती घेतली. कारची तपासणी करताना डिक्कीमध्ये, पाठीमागील सीटखाली पांढऱ्या व खाकी रंगाच्या पोत्यांमध्ये प्रतिबंधित गुटखा आढळून आला. आरोपी अभय दिनेश सोळंके,वय ३० वर्षे रा. मुंगी, ता. धारूर, जि. बीड हा राज्य शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा विक्री व अवैध व्यापार करण्याच्या उद्देशाने वाहतूक करत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्याविरुद्ध चाकूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे निर्देशावरून, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख, पोलीस अंमलदार संजय कांबळे, सुर्यकांत कलमे, पाराजी पुठेवाड यांनी केली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...



**छत्रपती संभाजीनगर, दि.२० :** भगवत गीता देत जालना, छत्रपती संभाजीनगर जिल्हयात जाऊन हिंदूधर्म जनजागृती करत असलेले संपादक सिद्धेश्वर थोर यांनी शहरातील प्रसिद्ध उद्योजक रुद्राणी इन्फ्रा चे व्यवस्थापकीय संचालक विवेक देशपांडे यांची भेट गीत त्यांना गीता दिली.

### एमजीएमच्या विश्वजीत कुलकर्णी याची निवड



**छत्रपती संभाजीनगर, दि.२० :** तलवारबाजी खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स स्पर्धा सोमवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ ते ५ डिसेंबर २०२५ दरम्यान कोटा, राजस्थान येथे होणार आहे. या स्पर्धेसाठी एमजीएम विद्यापीठाचा विद्यार्थी विश्वजीत कुलकर्णी याची निवड झाली आहे. यापूर्वी जम्मू कश्मीर येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय तलवारबाजी स्पर्धेमध्ये विश्वजीतने फाईल वैयक्तिक प्रकारामध्ये पहिल्या आठमध्ये आपले स्थान मिळवले होते. याच कामगिरीच्या आधारे त्याची खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. एमजीएम विद्यापीठाच्या या संघाला एमजीएम विद्यापीठाचे क्रीडा विभागप्रमुख डॉ.दिनेश वंजारे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या स्पर्धेसाठी एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, क्रीडा विभागातील डॉ.शशिकांत सिंग, डॉ. श्रीनिवास मोतीयेळे, डॉ.सदाशिव जव्हेरी, डॉ. रहीम खान आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

### अभिनेता बृज भूषण शुक्ला सुरेशच्या भूमिकेत

**संभाजीनगर, दि.२० :** एण्ड टीव्हीवरील अलौकिक विनोदी मालिका 'घरवाली पेडवाली'मध्ये अभिनेता बृज भूषण शुक्ला सुरेशच्या भूमिकेत झळकणार आहेत. भय, विनोद आणि अद्भुत अलौकिक घटकांचा मिलाफ असलेल्या या मालिकेत प्रेक्षकांना मनोरंजनाची मेजवानी मिळणार आहे. ओटीटी आणि वेब सिरीजमधील प्रभावी अभिनयासाठी ओळखले जाणारे बृज भूषण शुक्ला, या मालिकेत जीतूचे वडील आणि रमेश-सुरेश या मजेदार जुळी भावंड जोडीतील सुरेशची भूमिका साकारत आहेत. हॉरर-कॉमेडीच्या संकल्पनेमुळे त्यांनी हा प्रकल्प त्वरित स्वीकारल्याचे सांगत त्यांनी अधिक उत्साह व्यक्त केला. सुरेश हा बेफिकीर, थोडा बेजबाबदार पण मनाने भावूक असा व्यक्तिरेखा असल्याचे ते म्हणाले.

### सीडीएसएलने केली आयडीयाथॉनची सुरुवात

**मुंबई :** आशियातील पहिली सूचीबद्ध डिपॉझिटरी आणि १६.७ कोटींहून अधिक डी-मॅट खात्यांची विश्वासार्ह संरक्षक असलेली सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडने (सीडीएसएल) विद्यार्थ्यांसाठी एक नवीन आव्हानात्मक उपक्रम सुरू केला आहे. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी पहिले आयडीयाथॉन लॉँच केले आहे. सीडीएसएलच्या वार्षिक रीइमॅजिन चर्चासत्राच्या तिसऱ्या आवृत्तीअंतर्गत पुनर्कल्पना आयडीयाथॉन हा उपक्रम राबवण्यात येत आहे.भारतातील शिकण्याच्या, गुंतवणूक करण्याच्या आणि वाढीच्या पद्धतीत बदल घडवून आणतील अशा उपाययोजना डिझाइन करण्यात तरुण नवोन्मेषी मनांना गुंतवून ठेवणे हे आयडीयाथॉनचे उद्दिष्ट आहे. जेणेकरून बाजारातील सहभाग अधिक जबाबदार आणि समावेशक होईल.

### अजिंठाला इंडोनेशिया राजदूत यांची भेट



**फर्दापूर, दि. २१ :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणी ला इंडोनेशियान दूतावासाच्या शिष्टमंडळाने भेट दिली यावेळी त्यांच्या सोबत ५१ जन सोबत होते. यावेळी त्यानी लेणी क्रमांक एक , दोन नऊ, दहा सोळा, सत्तरा एकोनाववीस सव्वीस आदी लेण्यांना यावेळी त्यांनी बघितल्या यावेळी त्यांना पूर्ण माहिती अमोद बसुले यांनी दिली.यावेळी लेणी पाहून फार आनंद झाला पर्यटकांनी डोली बसून लेणी पाहण्याचा आनंद घेतला.

यावेळी लेणीस भेट दिल्यावर त्यांनी स्वताहाचा दिलेला अभिप्राय पुढीप्रमाणे. माझी आणि माझ्या सर्व मित्रांची अजिंठा भेट अविस्मरणय राहिली अजिंठा बघितल्यावर मला भारताच्या महान इतिहासाची नवीन माहिती मिळाली अजिंठा लेणी खरोखरच खूप सुंदर तर आहेच सोबत अजिंठाची लेणी आणि त्यांची संरचना आत्याधुनिक वास्तू कलेचा उत्कृष्ट नमुना आहे त्यामुळे भारताच्या उज्वल इतिहासाच्या बद्दल संपुर्ण जगाने जाणून घ्यायला पाहिजे. शिल्प कलाकृती व सुंदर कोरीव लेण्या खूपच छान आहेत.

या लेण्याचे जतन आणि संवर्धन खूप चांगल्या पदधतीने करण्यात आले आहे. यावेळी पुरातत्व विभागाचे अधिकारी मनोज पवार, योगेश कुमार पर्यटन महामंडळाचे व्यवस्थापक राज पाटील, नायब तहसीलदार चेनसिग बहुरे, मंडळ अधिकारी कल्पना डिघोळे तलाठी वैभव जाधव, गणेश फुकटे,शुभम रावळकर यावेळी आदींनी दुतवासातील प्रत्येक पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.

# त्रिभाषा धोरण निश्चितीसाठी समिती

**छत्रपती संभाजीनगर, दि.२१ :** राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्याबाबत राज्य शासनाने गठीत केलेल्या डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समिती लोकांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी बुधवार दि.२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे येत आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी पूर्वतयारीचा आढावा घेतला. शिक्षण उपसंचालक कैलास दातखेळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी (योजना) अरुण शिंदे, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे, डॉ. विशाल तायडे, विवेकानंद महाविद्यालयाचे प्रा. केशरचंद राठोड, पवनकुमार गोरे, देवगिरी महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. समिता जाधव, डॉ. एम.एफ. मेवाड, पोलीस निरीक्षक शिवाजी तावरे आदी उपस्थित होते.



बैठकीत माहिती देण्यात आली की. त्रिभाषा धोरण निश्र्चिती समिती दि.२५ रोजी रात्री जिल्ह्यात येणार असून बुधवार दि.२६ रोजी सकाळी ११ वाजेपासून एमआयटी महाविद्यालयाच्या आनंद सभागृहात समिती विविध घटकांना भेटणार आहे. त्यात भाषा तज्ज्ञ, साहित्यिक, शिक्षण तज्ज्ञ, बालमानस तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, शिक्षण संस्था चालक, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, प्रसार माध्यम प्रतिनिधी, शिक्षक- पालक संघ आदी उपस्थित राहतील. त्यांचे म्हणणे समिती जाणून घेईल. समितीचे स्वरुप अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव, सदस्य- डॉ. सदानंद मोरे, डॉ. वामन केंद्रे, डॉ. अप्रणा मॉरिस, डॉ. सोनल कुलकर्णी, डॉ. मधुश्री सावजी, डॉ. भूषण शुक्ल, सदस्य सचिव संजय यादव राज्य प्रकल्प संचालक समग्र शिक्षा अभियान. समिती येणाऱ्या सर्व घटकांतील तज्ज्ञांचे म्हणणे ऐकून घेईल. तसेच संवाद साधेल,असे यावेळी सांगण्यात आले. यावेळी विभागातील पाचही जिल्ह्यातील लोक सहभागी होऊन आपले म्हणणे सादर करतील. बाहेरील जिल्ह्यातील लोकांना म्हणणे सादर करण्या करीता ज्यांना येथे येणे शक्य नाही त्यांच्यासाठी त्या त्या जिल्ह्यातून दूरदृष्य प्रणालीची सुविधा उपलब्ध करुन द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

## एमजीएममध्ये स्त्री मुक्ती परिषदेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर, दि.२१ :** एमजीएम विद्यापीठ आणि महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय



मराठवाडा पातळीवरील स्त्री मुक्ती परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत मराठवाड्यातील विविध स्त्री संघटना सहभागी होणार असून स्त्रियांच्या समस्यांवर आणि विशेषतः मराठवाड्यातील स्त्री प्रश्नावर चर्चा करून ठराव पास करणार आहेत.

या परिषदेचे उद्घाटन रविवार, दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता आईनस्टाईन सभागृह येथे एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

या परिषदेला मार्गदर्शन करण्यासाठी मुंबईहून डॉ.छाया दातार, श्रीरामपूरहून सामाजिक कार्यकर्त्या दिशा पिंकी शेख या पारलिंगी समूहाचे प्रश्न आणि सद्य:स्थिती या विषयावर तर नांदेडहून डॉ.सुप्रिया गायकवाड या मराठवाड्यातील स्त्री प्रश्न आणि जात वास्तव या विषयावर भाष्य करणार आहेत.

मराठवाड्यातील स्त्रियांच्या समस्यांवर वेगवेगळ्या गटचर्चेतून मांडणी करण्यात येणार आहे. त्यानंतर अंबाजोगाईच्या डॉ.अरुंधती पाटील ठराव वाचन करतील.

१९७५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केलेल्या आंतरराष्ट्रीय महिला वर्षाला २०२५ मध्ये पन्नास वर्ष पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने स्वातंत्र्यपूर्व काळापासून कार्यरत असलेल्या स्त्री संघटना आणि व्यक्तींनी एकत्र येऊन पन्नास वर्षात स्त्रियांच्या जीवनातील परिवर्तनाचा परामर्श घेण्यासाठी व स्त्री चळवळीच्या पुढील वाटचालीसाठी महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद या स्त्रीवादी मंचाची जानेवारी २०२५ मध्ये गठन केले आहे .

सगळ्या विषमता विरोधात एकत्रित आवाज उठवण्याचा निर्धार या मंचाच्या वतीने करण्यात आला आहे, त्यासाठी वर्षभर विविध मोहिमा, शिबिरे, चर्चा, परिषदा आयोजित करण्यात येत आहेत, त्या निमित्तानेच ही परिषद होत आहे. या परिषदेमध्ये जास्तीत जास्त स्त्रियांनी सहभागी व्हावे, असे आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## एमजीएममध्ये संवाद सत्र संपन्न

**छत्रपती संभाजीनगर, दि.२१ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या आंतर विद्याशाखा अध्यासन विभागात 'गांधी आणि त्यांची सामाजिक बांधिलकी' या विषयावर गांधी साहित्याचे अभ्यासक, प्राचार्य विश्र्वास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली फॅकल्टी टॉक आयोजित करण्यात आला होता. यामध्ये विद्यापीठातील आंतर विद्याशाखा अध्यासन विभागातील गांधी अध्यासन, तत्वज्ञान, शिक्षण शास्त्र, शारिरिक शिक्षण, ग्रंथालय शास्त्र, संगीत व नाट्यशास्त्र, स्त्री अध्यासन व भाषा शास्त्र संस्थेतील प्राध्यापकांनी सहभाग घेतला होता.

यावेळी बोलताना प्राचार्य विश्र्वास पाटील म्हणाले, महात्मा गांधी वकील होते ते त्यांचा व्यवसाय करू शकले असते, परंतु त्यांनी समाजाप्रती बांधिलकी कशी जपली आणि त्यांच्या हातून सर्व मानव जातीला आदर्श ठरेल असे त्यांनी मूल्यात्मक कार्य केले.

वर्तमान काळातील बोथट होत असलेल्या सामाजिक संवेदना बाबत सर्व प्राध्यापकांनी चिंता व्यक्त केली. परंतु याच बरोबर आपण करत असलेल्या सामाजिक उपक्रमाची जाणीव व्यक्त केली. यावर विश्र्वास पाटील यांनी एमजीएम विद्यापीठ हे संस्थात्मक रित्या महात्मा गांधींच्या सामाजिक कार्याची जबाबदारी कशी पुढे नेत आहे त्याबद्दल अभिनंदन केले. गांधी हे आंतर आणि बाह्य एकच होते. जे त्यांच्या मनात होते ते कार्यात दिसत असे. हा गांधींच्या व्यक्तिमत्वाचा तात्कालिक कालखंडात प्रभाव होता तो जनतेने स्वीकारला. आपली पत्नी, समाज, आश्रमातील व्यक्ती यांना ते एकच मानत होते. सामाजिक बांधिलकी जपत असताना गांधी हे कडक शिस्तीचे होते पण ते तेवढेच दयाळू सुद्धा होते हे त्यांच्या जीवनातून दिसते, हे पाटील यांनी सांगितले.

# 'निर्धार' चित्रपटाचा उत्कंठावर्धक ट्रेलर प्रदर्शित

**छत्रपती संभाजीनगर, दि.२१ :** नेहमीच तरुणाईने इतिहास घडवला असल्याची साक्ष इतिहास देतो. कोणत्याही पिढीतील तरुणाईमध्ये समाजातील कोणत्याही क्षेत्रात क्रांती घडविण्याची धमक असते. यासाठी केवळ तरुणाईने एकजूट होण्याची गरज असते. समाजात बदल घडविण्याची अद्भुत शक्ती असलेल्या तरुणाईच्या संघर्षाची कथा 'निर्धार' या आगामी मराठी चित्रपटाद्वारे प्रेक्षकांसमोर येणार आहे. 'वंदे मातरम...' या सुमधूर गीतानंतर या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. २८ नोव्हेंबर रोजी हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

निर्मात्या पद्मजा वालावलकर यांनी जयलक्ष्मी क्रिएशनच्या बॅनरखाली 'निर्धार' चित्रपटाची निर्मिती केली आहे. दिनानाथ वालावलकर यांनी लिहिलेल्या कथेवर चित्रपट बनविण्याची जबाबदारी दिग्दर्शक दिलीप भोपळे यांनी यशस्वीपणे पार पाडली आहे. 'निर्धार'ची कथा संघर्षाची असल्याचे सांगत चित्रपटाचा ट्रेलर सुरू होतो. हातात मशाली घेऊन धावणारे लोक आणि पेटलेली वस्ती दिसते. या चित्रपटातील लढा भ्रष्टाचाराविरोधी आहे. आगीत भस्मसात होणाऱ्या वस्तीतून

### २८ नोव्हेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात होणार प्रदर्शित

'अरे कुणीतरी वाचवा रे...', अशी आर्त किंकाळी ऐकू येते आणि थेट हृदयाला भिडते. त्यानंतर 'वंदे मातरम...' गाण्याची झलक पाहायला मिळते. खरोखर भ्रष्टाचारावर काही उपाय आहेत का, त्याचं उत्तर सर्वसाधारण नाहीच असे असणार. मग तो नष्ट कसा होईल? काय उपाय आहे? लेखकांनी याचे उत्तर या सिनेमातून दिले आहे. या चित्रपटाचा ट्रेलर उत्तरोत्तर उत्कंठा वाढविण्याचे काम करणारा आहे. संघर्षाची ही कथा प्रेरणेचे वादळ घेऊन २८ नोव्हेंबरला येत असल्याचे ट्रेलरच्या शेवटी सांगण्यात आले आहे.

'निर्धार'च्या ट्रेलरबाबत दिग्दर्शक दिलीप भोपळे यांनी सांगितले की, हा चित्रपट केवळ मनोरंजन करणारा नसून, समाजाला विचारांची खूप मोठी शिदोरी देणारा आहे. चित्रपट हे रसिकांपर्यंत पोहोचण्याचे प्रभावी माध्यम असल्याने तरुणाईची कथा तरुणाईच्याच माध्यमातून पोहोचवण्याचे काम 'निर्धार' करणार असल्याचे दिग्दर्शक दिलीप भोपळे म्हणाले. या चित्रपटात समाजातील आणि राजकीय पटलावरील विविध मुद्यांवर भाष्य करण्यात आले आहे. तरुणाईची मानसिकता, विचारसरणी आणि दृष्टिकोन या चित्रपटाद्वारे समाजासमोर येणार आहे. समाजात वावरताना आणि समाजासाठी कार्य करताना आपणही समाजाचे काही देणे लागतो या भावनेतून 'निर्धार'ची निर्मिती केल्याची भावना निर्मात्या पद्मजा वालावलकर यांनी व्यक्त केली.

'निर्धार'मध्ये डॉ. गिरीश ओक, सौरभ गोगटे, पल्लवी पटवर्धन, प्रज्ञा केळकर, मिलिंद ऊके, उमेश बोळके, अभिनव कुरणे, जान्हवी सावंत, ऋतुजा कनोजिया, अभय पाटील, श्रेयस मोहिते,




दिनानाथ वालावलकर, युवराज झुगर, केतकी पाटील, पल्लवी प्रसाद, आनंद पाटील, सुरेंद्र केतकर, विद्या डांगे, एन. डी. चौगुले, कोमल रणदिवे आदी कलाकारांच्या भूमिका आहेत. वितरणाद्वारे महाराष्ट्रभरातील तमाम रसिकांपर्यंत 'निर्धार' पोहोचवण्याची जबाबदारी पिकल एंटरटेनमेंट करणार आहे. डिओपी अतुल सुपारे यांनी सिनेमॅटोग्राफी केली असून, विकी बिडकर यांनी कला दिग्दर्शन केलं आहे. रंगभूषा अतुल शिधये करत असून, वेशभूषा प्रशांत पारकर यांनी केली आहे. निर्मिती व्यवस्थापक कैलास भालेराव, तर अजय खाडे लाईन प्रोड्युसर आहेत. नृत्य दिग्दर्शन संग्राम भालकर यांनी केले असून, क्रिएटिव्ह प्रोड्यूसर अथर्व वालावलकर आहेत.

# महाराष्ट्र विभागीय शाखेतर्फे कै.बी.जी देशमुख निबंध स्पर्धेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर, दि.२१ :** भारतीय लोक प्रशासन संस्थेच्या महाराष्ट्र विभागीय शाखेतर्फे आयोजित कै. बी. जी. देशमुख वार्षिक निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सन २०२५-२०२६ या वर्षात निबंध स्पर्धेसाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचे युग, सोशल मीडिया आव्हाने आणि संधी, नागरिकांचे जीवन सुलभ करणे या तीन पैकी कोणत्याही एका विषयावर निबंध सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. निबंध हा वरीलपैकी कोणत्याही एका विषयावर इंग्रजी किंवा मराठीतून सादर करावयाचा आहे. निबंध ३ हजार शब्दांपेक्षा कमी आणि ५ हजार शब्दांपेक्षा जास्त नसावा, निबंध हा विषयाच्या अनुषंगाने विश्लेषणात्मक, संशोधनपर व पदव्युत्तर दर्जाचा असणे अपेक्षित आहे.

निबंध कागदाच्या एकाच पृष्ठभागावर टंकलिखित करुन त्यावर केवळ टोपणनांव लिहून चार प्रतीत सादर करावा. या स्पर्धेसाठी पहिले बक्षिस १० हजार रुपये, दुसरे बक्षिस ७ हजार ५०० रुपये, तिसरे बक्षीस ५ हजार रुपये उत्तेजनार्थ बक्षिस २ हजार रुपये देण्यात येणार आहेत. योग्य त्या गुणवत्तेचा निबंध नसल्यास स्पर्धकास बक्षीस न देण्याचा किंवा बक्षिसाची रक्कम कमी करण्याचा अधिकार संस्था राखून ठेवीत आहे.

बक्षीस देण्याबाबत संस्थेचा निर्णय अंतिम राहील. संस्थेच्यावतीने यापूर्वी घेतलेल्या स्पर्धेत विजेता ठरलेला किंवा उत्तेजनार्थ बक्षीस प्राप्त स्पर्धक हा लगतची तीन वर्षे या स्पर्धेत भाग घेण्यास पात्र ठरणार नाही.

# घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर रोखा : जिल्हाधिकारी डॉ. आशिया

**अहिल्यानगर, दि. २१ :** घरगुती गॅस सिलेंडरचा अवैधरित्या व्यावसायिक आस्थापनांमध्ये होणारा वापर थांबवून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले , घरगुती वापरासाठी असलेल्या अनुदानित एलपीजीचा हॉटेल, ढाबे यांसारख्या व्यावसायिक ठिकाणी अवैध वापर होत असल्याने सार्वजनिक सुरक्षिततेला धोका निर्माण होत आहे आणि शासनाच्या निधीचे मोठे नुकसानही होते आहे. त्यामुळे घरगुती गॅस सिलेंडरच्या काळाबाजारावर तात्काळ ठोस कारवाई करण्यात यावी. अवैध रिफिलिंग आढळल्यास संबंधित गॅस एजन्सीवर कारवाई करून तिचे परवाने रद्द करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

घरगुती गॅसच्या अवैध व्यापारात सहभागी किंवा गैरव्यवहार करणाऱ्या गॅस एजन्सींना देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र तातडीने रद्द करावे. तसेच पेट्रोलियम अधिनियमांतर्गत एजन्सीची साठवणूक आणि विक्रीची परवानगीही तत्काळ रद्द करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

ग्राहकांनी गॅस सिलेंडर घेताना वजन काट्यावर तपासून घ्यावे तसेच लिकेज डिटेक्टरद्वारे गॅस गळतीची खात्री करून घ्यावी.

अवैध रिफिलिंगमुळे गॅस गळतीची आणि मोठ्या अपघातांची शक्यता असते. त्यामुळे आपले गॅस सिलेंडर इतरांना देऊ नयेत आणि घरगुती सिलेंडर व्यावसायिक वापरासाठी अजिबात वापरू नयेत.

घरगुती गॅसचा अवैधरित्या वापर होत असल्याची माहिती मिळाल्यास ती संबंधित कंपनीच्या सेल्स अधिकारी किंवा नोडल अधिकाऱ्यांना देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.



## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क. २०२५/मशाका/जमाबंदी- १/जन्म-मृत्यु नोंद/सिञ्जार-१०७, उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

दिनांक ०७/११/२०२५

अर्जदार ००- मुजक्कीर अमीन शेख रा. नितीन नगर कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार : नगर परिषद कार्यालय कन्नड ता. कन्नड ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर.

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपररोक्त विषयी अर्जदार यानी त्यांचे विधीज्ञ/ॲड. मार्फत स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतः चे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा स्वतः मुजक्कीर अमीन शेख चा जन्म दिनांक ०५-०२-१९८६ रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांच्या स्वतः चा जन्म दिनांक ०५-०२-१९८६ रोजी कन्नड ता. कन्नड/ता. कन्नड येथे झालेला आहे, त्यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे त्यामुळे तमा अर्ज अर्जदार यानी.मा न्यायालयात दाखल केलेला आहे. सदर जाहिर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस सूचीत करण्यात येते की अर्जदार यांचा स्वतः मजकिर आमीन शेख यांचा जन्म दिनांक ०५-०२-१९८६ रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २४-१२-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा मुदतीत जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. आक्षेप न आल्यास अर्जदारास दिनांक ०५-०२-१९८६ रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्मल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल त्यानंतर आलेले आक्षेप गृहीत धरण्यात येणार नाही. करिता दिनांक.११/२००५ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शीक्क्यानिशी दिले आहे.

**उपविभागीय अधिकारी कन्नड करिता**

## जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर**
ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

कि. दिवाणी अर्ज क्र. ७७८/२०२५

अर्जदार

गैरअर्जदार प्रकरण

१) ताराबाई भ्र. गोकुळ रोडगे, वय६४ वर्षे धंदा शेती, रा. जामगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) बाळासाहेब गोकुळ रोडगे, वय ३९ वर्षे धंदा शेती, रा. जामगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) ज्ञानेश्वर गोकुळ रोडगे, वय ३७ वर्षे धंदा शेती, रा. जामगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर, ४) सौ. उज्वला अनिल लगरे, वय ३३ वर्षे धंदा शेती, रा. वाहेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर.

निरंक विरुध्द

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए. एस. इंगळे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. २ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिण असुन अर्जदार क्र.१ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील नामे गोकुळ रंगनाथ रोडगे हे मौजे जामगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०२/०९/२०२५ रोजी मोजे जामगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत गोकुळ रंगनाथ रोडगे यांना अर्जदार हाच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदाराच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक /११/२०२५ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक ०९/०१/२०२६ रोजीची आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक
**सहाय्यक अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय गंगापूर

## जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर**

कि.दि. अर्ज क्र. ७५१/२०२५

अर्जदार
ता. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

१) ज्योती भ्र. शरद दिक्षीत, वय ५१ वर्षे, धंदा गृहिणी रा. परदेशीपुरा, गंगापुर, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर. २) सौ. वृषाली करण अग्निहोत्री, वय ३१ वर्षे धंदा गृहिणी, रा. वाकड रोड, हनुमान मंदिराच्या समोर, वाकड, पिंपरी चिंचवड पुणे. ३) गौरी पि. शरद दिक्षीत, वय २६ वर्षे, धंदा शिक्षण रा. ब्राम्हण गल्ली, गंगापुर, गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर.

न्यायालय गैरअर्जदार :
निरंक: प्रकरण विरुध्द

हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए. बी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. २ व ३ या आपसांत नात्याने सख्या बहिणी असुन अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ व ३ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील नामे शरद पुरुषोत्तम दिक्षीत हे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १९/०९/२०२४ रोजी मयत झालेले आहे. मयत शरद पुरुषोत्तम दिक्षीत यांना अर्जदार हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. सदर प्रकरणात पुढील तारीख दि. २३/१२/२५ रोजीची ठेवण्यात आली आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २१/११/२०२५ रोजी दिले.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय गंगापूर

## अग्रलेख...

# प्रायश्चित्ताची संधी...!

गेल्या जवळपास वर्षभरापासून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेसच्या झेंड्याखाली इंडिया आघाडी किंवा महागठबंधन या नावाने एकत्र आलेले भाजपाविरोधी पक्ष यांनी एकमुखाने चालविलेल्या 'मतचोरी' या निरर्थक आरोपाचा गदारोळ थांबवून गांभीर्याने आत्मपरीक्षण करण्याची संधी या आघाडीकडे आता चालून आली आहे. गेल्या सुमारे साडेअकरा वर्षांत देशात आणि वेगवेगळ्या राज्यांत झालेल्या सर्व निवडणुकांमध्ये एकामागून एक पराभवाचे फटके बसल्यानंतर कोणत्याही समंजस आणि परिपक्व राजकीय नेत्याने व त्याच्या नेतृत्वाखाली एकत्र आलेल्या प्रत्येक राजकीय पक्षाने आत्मपरीक्षण केले असते. पण, राहुल गांधी आणि त्यांच्या पक्षाने तसेच महागठबंधनातील जवळजवळ सर्वच पक्षांनी डोळ्यावर कातडे ओढून मतचोरीचा एकच मुद्दा सातत्याने लावून धरला आणि जनादेशाच्या जोरावर निवडणुका जिंकलेल्या पक्षांवरील जनतेच्या विश्वासावर प्रश्नचिन्ह उमटवले. लोकशाहीमध्ये जनतेचा कल आणि कौल हा सर्वश्रेष्ठ मानला जातो. जनतेने एखाद्या राजकीय पक्षाच्या हाती सत्तेची सूत्रे सोपविली की, त्या पक्षावर जनतेचा संपूर्ण विश्वास आहे, असे मानले जाते. असा जनादेश अन्य सर्व पक्षांनी समंजसपणे स्वीकारावयाचा असतो. मात्र, राहुल गांधी आणि त्यांच्या पक्षाने किंवा महागठबंधन व इंडिया आघाडी नावाने केवळ भाजपाविरोधाच्या एकाच समान मुद्यावर एकत्र आलेल्या पक्षांनी लोकशाहीचा हा संकेत स्वीकारला नाही; जनादेशाचा आदरही केला नाही, असेच त्यांच्या वर्तनावरून स्पष्ट झाले. जनतेने प्रचंड विश्वासाने निवडून दिलेल्या भाजपप्रणीत रालोआच्या विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे म्हणजे अप्रत्यक्षपणे जनतेचा कौल नाकारण्यासारखेच आहे. बिहारच्या विधानसभा निवडणुकांमधील निकालातून जनतेने पुन्हा एकदा या खेळात रस नसल्याचा निर्वाळा देऊन महागठबंधनास स्पष्टपणे नाकारले.

आता महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांची रणधुमाळी सुरू झाली आहे. बिहारच्या निवडणुकीत जनतेने दिलेला स्पष्ट कौल आणि ज्या असमंजस आरोपांच्या आधारावर राजकारण करण्याचा खेळ महागठबंधनाने सुरू केला, त्यामधील फोलपणा स्पष्ट झाल्याने महाराष्ट्रातील महागठबंधनात सहभागी पक्षांस पुरेसे शहाणपण आले असावे, असे दिसत आहे. तसे काही संकेत या आघाडीतील घटक पक्षांच्या भूमिकेवरून मिळू लागले आहेत. मतचोरीचा मुद्दा फोल ठरल्यावर पराभवाची कारणे शोधण्यासाठी आता काही नवा मुद्दा निर्माण करावा लागेल. कारण याआधी मतदान यंत्रे, व्हीव्हीपॅट यंत्रे आदींबाबतच्या शंकांना परस्पर उत्तरे मिळाली आहेत. राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली निवडणुका लढविल्यास महागठबंधनातील घटक पक्षांना यशाची खात्री नाहीच; उलट यश मिळण्याबाबत शंकाच वाटू लागली आहे. त्यामुळे आता महागठबंधनाच्या तंबूतून एक एक पक्ष काढता पाय घेऊ लागल्याचेही दिसत आहे. हीच स्थिती महाराष्ट्रातही पाहावयास मिळत आहे. या आघाडीला पहिला रामराम ठोकण्याचा मान समाजवादी पार्टीने पटकावला आहे. महाराष्ट्रात हा पक्ष काँग्रेससोबत निवडणुका लढविणार नाही, हे जाहीर झाले आहे. महाराष्ट्रात याच आघाडीने महाविकास आघाडी या नावाने आपला राजकीय अवतार धारण केला होता. त्याचे नेतृत्व काँग्रेसकडेच होते आणि महायुतीमधून बाहेर पडलेल्या उद्धव ठाकरे यांना या आघाडीचा आयता आधार मिळाल्याने त्यांचा पक्ष काही निवडणुकांत तरला होता. आता या आघाडीतील काँग्रेसनेच उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला झिडकारून टाकले आहे. ठाकरे गटासोबत आघाडी नाही, ही स्पष्ट भूमिका काँग्रेसने घेतली आहे. महाविकास आघाडी खिळखिळी झाली आहे. काँग्रेसकडे स्वबळावर निवडणुका जिंकण्याची ताकद नाही, याची जाणीव या पक्षाच्या नेत्यांनाही आहे. असे असतानाही आघाडीतील एका पक्षास, म्हणजे ठाकरे यांच्या गटास बाहेरची वाट दाखविण्याचे धाडस काँग्रेसने दाखविले आणि स्वबळावर निवडणुका लढविण्याचा पवित्रा घेऊनही, शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत आघाडीसाठी त्यांची मनधरणी सुरू केली. मतचोरीच्या मुद्यावर पुढच्या निवडणुका लढविता येणार नाहीत, याचा साक्षात्कार झाल्याचा हा पूर्ण परिणाम म्हणावा लागेल. राज्यात काँग्रेसकडून हा मुद्दा आता मागे टाकला जाईल, त्याचे अनुकरण करून काँग्रेसच्या राष्ट्रीय स्तरावरील नेत्यांकडूनही हा मुद्दा गुंडाळण्यासाठी बेमालूम कारण शोधण्याचे प्रयत्न सुरू होतील, असे संकेत मिळत आहेत. या मुद्यावरून उभा पक्ष वेठीस धरून राहुल गांधींनी पक्षाचे मोठे नुकसान केले व त्या नकारात्मक राजकारणाचा थेट फायदा मात्र भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीस झाला, अशी कुजबूज काँग्रेसमध्ये सुरू झाल्याची चर्चा आहे. मतचोरीच्या नावाने मोठमोठे गौप्यस्फोट केल्याच्या आविर्भावात राहुल गांधी यांनी समोर आणलेल्या प्रत्येक मुद्याचे सनदशीर मार्गाने संबंधित यंत्रणांनी वारंवार खंडन केले होते. या काळात निवडणूक आयोगासह अन्य संबंधित यंत्रणांनी दाखविलेल्या समंजसपणाचे कौतुकच करावे लागेल. कारण अशा निरर्थक व बिनबुडाच्या खेळात स्वतःहून उडी न घेता योग्य वेळी त्यातील फोलपणा दाखवून देत निवडणूक आयोगाने आपल्या भूमिका स्पष्ट केल्याने राहुल गांधी यांचे कथित हॅड्रोजन बॉम्बदेखील निकामी ठरल्याचे स्पष्ट झाल्यावर महागठबंधनास गळती लागणे अपरिहार्य होते.

आता त्यानुसार या आघाडीची घसरगुंडी सुरू झाली आहे. राहुल गांधींनी निवडणुकांच्या तोंडावर निरर्थक आरोपांची राळ उडवून वाया घालविलेल्या वेळामुळे गमावलेल्या संधींचे गाठोडे पुन्हा एकदा नव्याने जोडण्याची जाणीव काँग्रेसजनांस होऊ लागली आहे, असे दिसते. गेल्या वर्षभरात झालेल्या या चुकांची दुरुस्ती करण्यासाठी काही पोषक वातावरण तयार होण्याची काँग्रेसजनांस प्रतीक्षादेखील होती. ते वातावरण आता तयार झाले आहे. कालपरवापर्यंत राहुल गांधींच्या आरोपसत्रांतील फोलपणा लक्षात येऊनही तो त्यांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी व लोकशाही संस्थांविषयी जनतेच्या मनात संभ्रम पसरविण्याची खेळी योग्य नसल्याचे जाणवून देण्यासाठी पक्षातून किंवा महागठबंधन आघाडीतील कोणीच पुढे येत नव्हते. भाजपकविरोधाच्या व्याधीने ग्रासलेल्या समाजघटकांनीही यावर मौनच पाळून राहुल गांधींच्या भूमिकेचे अंध समर्थन करीत संभ्रमाच्या फुग्यात हवा भरण्याचा उद्योग चालविला होता. समाजमाध्यमांचे वेगवेगळे मंच त्यासाठी सज्ज ठेवले गेले होते. आता या फुग्यास टाचणी लागली आहे आणि मतचोरीच्या आरोपाची हवा पुरती काढून घेण्याचे कामही सोपे झाले आहे. देशातील समंजस समाजातील काही नामवंत घटकांमधील प्रतिष्ठितांनी पुढे येऊन अखेर या आरोपांचा फुगा फोडण्याकरिता पुढाकार घेतल्याने काँग्रेसजनांनी व महाविकास आघाडीतील अन्य पक्षांनीही सुटकेचा निःश्वास सोडला असेल. जे काम पक्षाच्या अंतर्गत मंचावरून व्हावयास हवे होते, त्या कामाची सुरुवात या मान्यवरांनी करून दिली आहे. मतचोरीच्या मुद्यावर निवडणूक आयोगावर वारंवार केलेली टीका निरर्थक असून निषेधार्ह आहे, अशा स्पष्ट शब्दांत राहुल गांधी यांना सुनावणारे खुले पत्र देशातील वेगवेगळ्या क्षेत्रांतील २७२ नामवंतांनी प्रसिद्ध केले आहे. असे निरर्थक आरोप करून आपल्या राजकीय पराभवाला लोकशाहीवरील संकट असल्याचे भासविण्याचा हा प्रयत्न म्हणजे वारंवार होत राहिलेल्या पराभवातून आलेला हताशपणा असून या पक्षांचे जनतेशी असलेले नाते संपुष्टात आल्याने जनतेच्या अपेक्षा समजून घेण्यात आलेल्या अपयशाचे प्रतिबिंब आहे, अशी भावना या नामवंतांनी या खुल्या पत्रात व्यक्त केली आहे. हे आरोप फोल आहेत, जनतेस ते मान्य नाहीत व जनतेने ते धुडकावून लावले आहेत, याची जाणीव होऊनही तसे उघडपणे बोलण्याचे धाडस दाखविता न आल्याने झालेले पक्षाचे नुकसान भरून काढण्याकरिता चुकांची दुरुस्ती करावी लागते. ती संधी या पत्रामुळे काँग्रेसला मिळाली आहे आणि काँग्रेससोबत असलेल्यांचे महागठबंधनाच्या तंबूतून बाहेर पडून त्या चुकांचे परिणाम भोगण्याचे प्राक्तनही संपले आहे. शुद्ध आणि प्रामाणिक राजकारणाची जुनी परंपरा पुन्हा सुरू करण्याची संधी या निमित्ताने राजकारणास मिळाली, तर ते चांगलेच होईल. ▮

## प्रासंगिक

# श्रीराम मंदिर; राष्ट्रीय संकल्प-सिद्धीची पूर्तता

**प्रमोद मुजुमदार**

या वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाल्याने संपूर्ण देशभर 'शताब्दी वर्ष' साजरे केले जात आहे आणि याच शताब्दी वर्षात अयोध्या येथे श्रीराम जन्मभूमीवर भव्य मंदिर पुनर्निर्माण करण्याचा राष्ट्रीय संकल्प पूर्तता समारोह २५ नोव्हेंबर २०२५ रोजी संपन्न होत आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा भव्य संकल्प-सिद्धी सोहळा पूर्ण होत असल्याने याचे एक विशेष महत्त्व आहे आणि योगायोगही आहे. आपणा सर्वांना हेसुद्धा चांगलेच स्मरत असेल की, या मंदिराच्या पुनर्निर्माण कार्याचे भूमिपूजनही सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. मंदिराचे बांधकाम इतके युद्धपातळीवर झाले की अगदी नियोजित वेळेनुसार अयोध्या येथे गेल्या वर्षी २२ जानेवारी २०२४ रोजी पंतप्रधान मोदी आणि सरसंघचालक डॉ. भागवत यांच्या हस्ते श्रीरामललाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा विधिवत संपन्न झाली.

पाहता पाहता आज एक वर्षापेक्षा जास्त झाले आहे. या मंदिराच्या पुनर्निर्माणाचे उर्वरित बांधकाम, परकोटा म्हणजे आजच्या भाषेत कंपाऊंड वॉल आणि आसपासच्या परिसरातील काही प्रमुख मंदिरांचे बांधकामही पूर्ण झाले आहे. गेल्या वर्षीप्रमाणे प्राणप्रतिष्ठा सोहळा जेवढ्या भव्य प्रमाणात आयोजित केला होता तेवढा हा २५ नोव्हेंबरचा सोहळा मोठा नसणार, परंतु पंतप्रधान व सरसंघचालक यांच्या व्यतिरिक्त उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह प्रमुख धर्माचार्य, महंत, विविध संप्रदाय प्रमुख आणि मुख्यत्वे करून पूर्व उत्तर प्रदेशातील सुमारे १० ते १५ हजार लोक या मंदिराच्या पुनर्निर्माण कार्याच्या पूर्तता सोहळ्यास उपस्थित राहण्याची शक्यता आहे. सोहळ्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे श्रीराम मंदिराच्या शिखरावर ध्वजारोहण करून संपूर्ण विश्वाला श्रीराम जन्मभूमीवर मंदिर पुनर्निर्माण कार्याची पूर्णता झाल्याचा संदेश देणे आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष गोविंददेवगिरी महाराज यांनी सांगितले की, मंदिराच्या कळसावर लावला जाणारा हा ध्वज भगव्या रंगाचा असून, त्यावर वाल्मीकि रामायणात वर्णन केलेल्या रघुवंशाचे प्रतीक सूर्य व कोविदार वृक्षाचे प्रतीकही दर्शविण्यात आले आहेत. ध्वजाची लांबी २२ फूट आणि रुंदी ११ फूट असेल. हा ध्वज १६१ फूट उंच शिखरावर लागणार आहे. याप्रसंगी मंदिराच्या बांधकामात अगदी सुरुवातीच्या काळातील मजूर, कामगार, तंत्रज्ञ, अभियंता आदींचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. मंदिरातील रामललाची मूर्ती तयार करणारे कर्नाटकमधील म्हैसूर येथील युवा मूर्तिकार अरुण योगिराज यांचाही गौरव होणार आहे.



श्रीराम जन्मभूमीवर मंदिर पुनर्निर्माणाचे काम पूर्ण होत असताना, यासाठी आपल्या अगोदरच्या पिढीने सुमारे ५०० वर्षे प्रचंड संघर्ष केला, अनेकांनी अन्याय, अत्याचार सहन केला. हा संघर्ष केवळ रस्त्यावर नाही तर न्यायालयातही कित्येक वर्षे चालला होता. रामभक्त हिंदू समाजाला अनेकदा अग्निपरीक्षा द्यावी लागली. प्रामुख्याने संघ परिवाराच्या सामूहिक एकजुटीचे प्रयत्न आणि समाजातील सर्व स्तरांतील घटकांचा भरपूर पाठिंबा यामुळे आज श्रीराम जन्मभूमीवर मंदिराचे पुनर्निर्माण कार्य पूर्ण होत आहे. आज मंदिर पुनर्निर्माणाचे काम पूर्णत्वास पोहोचले आहे तेव्हा याअगोदर विश्व हिंदू परिषदेचे ज्येष्ठ नेते दिवंगत अशोक सिंघल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक मोरोपंत पिंगळे, कारसेवक कोठारी बंधूंसह इतर अनेक ज्ञात-अज्ञात कार्यकर्त्यांचे स्मरण होणे अगदी स्वाभाविक आहे.

देशवासीयांना व विशेषतः रामभक्तांना मुद्दाम आठवण करून देणे आजच्या दिवशी प्रासंगिक आहे, कारण न्यायालयासमोर कायदेशीर संघर्ष, वाद-प्रतिवाद, तार्किक युक्तिवाद, विचार तर होत होते परंतु त्यासोबत बाहेर सामाजिक स्तरावर विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जात होते. यात १९८९ मध्ये शिलापूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी प्रत्येकाने एक-एक वीट दिलेली आहे आणि अशा देशभरातून एकत्र करण्यात आलेल्या विटा (शिला) मंदिराच्या बांधकामात उपयोगी पडल्या, हे येथे नमूद करण्यासारखे आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वात १९९० मध्ये सोमनाथ (गुजरात) ते अयोध्या अशी राम रथयात्रा काढण्यात आली. या राम रथयात्रेच्या माध्यमातून देशभरातील वातावरण राममय झाले होते. या अगोदर १९८२-८३ दरम्यान एकात्मता यात्रा देशातील तीन स्थानांहून काढण्यात आली. तीनही यात्रा आपल्या नियोजित कार्यक्रमानुसार एका निश्चित दिवशी नागपुरात पोहोचल्या. अशा काही घटनांमुळे देशांतील सर्व साधारण हिंदू जनमानसामधे प्रभू श्रीराम व आपल्या आराध्यासाठी आस्था, श्रद्धाभाव जागृत होतो. सोबतच हिंदू एकजुटीच्या कार्यक्रमामध्ये समाजाच्या सर्व स्तरातील लोकांनी आपला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सक्रिय सहभाग घेऊन विश्वास व्यक्त केला. अनेक वर्षे कायदेशीर प्रक्रिया पार पडल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने जवळपास ४० दिवस आणि सुमारे १७० तासपर्यंत नियमित सुनावणी केल्यानंतर ९ नोव्हेंबर २०१९ रोजी श्रीराम जन्मभूमी अर्थात रामललाच्या बाजूने निर्णय दिला.

न्यायालयाच्या निकालानंतर मोदी सरकारने वेगाने पावले टाकत एक न्यास (ट्रस्ट) स्थापन केला आणि रामजन्मभूमीवर मंदिराच्या पुनर्निर्माणाचे कार्य वेगाने सुरू झाले. मंदिर परंपरागत नागर शैलीमध्ये बांधण्यात आले आहे. एक महत्त्वाची उल्लेखनीय बाब अशी की मंदिराच्या बांधकामासाठी लागणारा पैसा केवळ कोट्यधीश श्रीमंतांकडून नाही तर देशभर अगदी पंचायत समितीच्या पातळीवर जाऊन जमविला आणि यामुळे येथे दर्शनाला येणाऱ्या प्रत्येक भाविकाला एक वेगळेच आत्मिक समाधान मिळते. सोबतच आणखी एका गोष्टीची आठवण आपल्या सर्वांना होईल की असाच धनसंग्रह कन्याकुमारी येथे विवेकानंद शिला स्मारक बांधण्यात आले त्यावेळी देखील करण्यात आला होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि संघ परिवारातील सर्व आनुषंगिक संघटनांच्या संयुक्त प्रयत्नाने देशवासीयांनी आपला सहभाग घेतला होता.

आता मंदिर पुनर्निर्माणाचे काम पूर्ण झाले असून या व्यतिरिक्त इतर अन्य कामे जसे परकोटाच्या आतील भागात भगवान सूर्य, भगवती देवी, गणपती व भगवान शंकर याशिवाय माता अन्नपूर्णा, तर दक्षिण बाजूस हनुमानाचे मंदिर बांधून तयार आहे. मंदिर परिसरात निषादराज, शबरी देवी, अहिल्या देवी, संत तुलसीदास, महर्षी वाल्मीकि, वशिष्ठ, विश्वामित्र, अगस्त्य, कुबेर टेकडीवर भगवान शंकराच्या मंदिरांचा जीर्णोद्धार केला आहे आणि तेथे जटायूची मूर्ती स्थापित केली आहे. अत्यंत छोटा जीव असलेली परंतु फार महत्त्वाचे अतुलनीय काम करणारी खारूताईची भव्य मूर्ती स्थापित केली आहे आणि ती सर्व भाविकांचे आकर्षण केंद्र बनली आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनातून विश्व हिंदू परिषदेने पुढाकार घेऊन हिंदू समाजातील विविध धर्म, मत, पंथ संप्रदायाचे प्रमुख धर्माचार्य, महंताच्या नेतृत्वाखाली रामजन्मभूमी मुक्ती आंदोलन झाले आणि समाजातील सर्व स्तरांतील घटकांचा सक्रिय पाठिंबा मिळाला. हा सक्रिय सहभाग पाहता मंदिर पुनर्निर्माण संकल्पाचे राष्ट्रीय संकल्पामध्ये रूपांतर झाले आणि म्हणूनच यांस राष्ट्रीय संकल्प पूर्तता म्हणणे सर्वथा योग्य व उपयुक्त ठरेल. पाचशे वर्षांच्या संघर्षानंतर आपल्या संकल्पाची पूर्तता होत असल्याचा अनुभव सर्व रामभक्त देशवासीयांना निश्चितच गौरवान्वित करील यात यत्किंचितही शंका नाही. ▮

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वेध

# सवय राजीनामा मागण्याची

**प्रफुल्ल क. व्यास**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मोजकेच बोलतात आणि तेवढेच हसतात! त्यांच्या शेपटावर कोणी पाय देत नाही तोपर्यंत ते आपण बरे आणि आपले राजकारण बरे असा त्यांचा स्थायीभाव! पण, त्यांच्या शेपटाला कोणी स्पर्श केला की, ते कोणाचाही मुलाहिजा ठेवत नाहीत. राज्यात सकाळी उठून सत्ताधाऱ्यांविरोधात टीका करण्यासाठी 'दांडेकर' पत्रकारांना बाईट देणारे खासदार संजय राऊत यांना मुख्यमंत्री फडणवीसांनी 'सकाळी नऊचा भोंगा' अशी पदवी बहाल केली. त्यांना ती तंतोतंत लागू झाली आणि अनेकांना ती भावलीही! संजय राऊत यांच्या खालोखाल सुषमा अंधारे आहेत. पण, त्यांना अजून पाहिजे तसा राजकीय प्रकाश गवसला नाही. राऊत आणि अंधारे या दोघांमध्ये एक नवीन 'धूमकेतू' आहे. राज्यात कुठेही आणि कोणताही विषय राजकारणासोबत जोडून आला की त्या अचानक प्रकटतात! ब्रेकिंगच्या नादात बातमी 'किंग' त्यांच्याकडे जातात. त्याही कोणताही आवाकावा न बघता थेट नेत्यांच्या राजीनाम्याची मागणी करून मोकळ्या होतात. त्या म्हणजे राजीनामा मागण्याची एकप्रकारे सवय असलेल्या अंजली दमानिया! त्या वादग्रस्तच आहेत. राज्यात अनेक नेत्यांचे त्यांनी राजीनामे मागितले. त्या पत्रकार परिषद घेऊन पुरावे देण्याची भाषा करतात. परंतु, त्यांनी अद्याप कोणाचे पुरावे दिले ना कोणाचा विषय तडीस नेला. अंजली दमानिया यांची प्रसार माध्यमांपुढे येण्याची तळमळ बघता त्या विशिष्ट परिस्थितीत आणि विशिष्ट व्यक्तींच्या विरोधात अचानक उगवतात. त्यांनी केलेल्या आजपर्यंतच्या एकाही आरोपात कोणाकडूनही राजीनामा घेतला गेला नाही. तरीही त्या राजीनामा मागण्याचा राग आळविल्याशिवाय राहत नाहीत. त्यामुळे दमानिया कोणाची तरी सुपारी घेतात का, असा प्रश्न उपस्थित होतो. ग्रामीण भागात प्रसिद्धीची खूप हौस असणाऱ्यांना 'छप्पासची बिमारी' असे उपरोधिकपणे म्हटले जाते. असाच काहीसा आजार दमानिया यांना झाला की काय, असे वाटू लागते. राजकारणात प्रश्न विचारणे ही लोकशाहीची ताकद आहे. पण, कधी कधी काही प्रश्न इतक्या वारंवार विचारले जातात की, ते अर्थहीन वाटू लागतात. आक्रमक, आवाज उठवणारी आणि हट्टाने लढा देणारी कार्यकर्ती अशी त्यांची काही वर्षांपूर्वी ओळख झाली होती. मात्र, आता त्यांनी 'राजीनामा मागण्याची' चळवळच हाती घेतली की काय, असे वाटून जाते. राजीनामा मागण्याचा प्रवास पार्थ पवार यांच्या जमीन खरेदी प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजीनामा द्यावा इथपर्यंत पोहोचला आहे. त्यांची मागणी कायम एकच- संबंधिताने राजीनामा द्यावा. परिस्थिती बदलली, पण, दमानियांच्या मागणीत बदल झाला नाही. त्यांनी राजीनामा मागितलेल्या नेत्यांची यादीही काही छोटी नाही. त्यांनी अनेकांना टार्गेट केले. अत्यंत ठोस पुरावे आणि गंभीर निष्कर्षाशिवाय दाबून मागणी होत असल्याने त्याचा प्रभावच मंदावत चालला आहे. सतत आणि सर्वांकडून राजीनामा मागितल्याने कुणाचे उत्तरदायित्व खरोखर वाढते की या मागणीचे सामर्थ्यच क्षीण होते? लोकशाहीत टीकाकारांचा आवाज महत्त्वाचा आहे. पण, तो आवाज विश्वासार्हतेवर आणि तर्कांवर उभा असायला हवा. दमानिया यांच्या आवाजात दम आहे, निर्भीडता आहे.□ पण जेव्हा प्रत्येक प्रकरणाचा शेवट 'राजीनामा' मागणीनेच होतो तेव्हा ती सवय वाटू लागते आणि जनताही त्यांना एवढेच धंदे आहेत, असे म्हणून मोकळी होते. तक्रार, आरोप, चौकशी, निष्कर्ष याशिवाय जर 'राजीनामा' हाच मुद्दा येत असेल तर ही लढाई सत्यासाठीच काय, असा प्रश्न उपस्थित केल्याशिवाय राहणार नाही. अंजली दमानिया यांच्या शैलीतील राजीनाम्याचे सातत्य इतके ठळक झाले आहे की, त्यावर टीका होऊ लागली आहे. प्रश्नांमध्ये तथ्य असतात तेव्हा आवाज प्रभावी असतो. अंजली दमानिया यांच्या आरोपांत विषय असू शकतो, तर्क असू शकतो. पण, त्यांची मागणी जर नेहमी एकाच दिशेने जात असेल तर लोकशाहीकडून अपेक्षित असलेली गंभीरता कमी झाल्याशिवाय राहणार नाही. नेत्यांनी उत्तरदायी असलेच पाहिजे. पण, मागण्यांनाही वजन असलं पाहिजे. अंजली दमानिया आरोपांच्या अखंड मोहिमेतील 'राजीनामा'चा राग गडकरींपासून फडणवीस, शिंदे, दरेकर आणि कालच्या ताज्या घडामोडीत अजित पवारांपर्यंत आवळला असला, तरी त्यांना ना सूर गवसला ना या सवयीवर इलाजही! ▮

९८८१९०३७६५

## विशेष

# कोण फोडेल काँग्रेस... प्रियांका गांधी?

**मोरेश्वर बडगे**

बिहार निवडणुकीच्या निकालानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपा कार्यकर्त्यांपुढे भाषण केले. या भाषणात मोदींनी एक मोठी भविष्यवाणी केली. 'काँग्रेस पुन्हा एकदा फुटेल' असे मोदी म्हणाले. काँग्रेस केव्हा फुटेल? कोण फोडेल? हे त्यांनी सांगितले नाही. पण मोदी बोलतात तेव्हा त्यांच्याकडे ठोस माहिती असणार. त्या जोरावरच त्यांनी हे संकेत दिले असणार. काँग्रेसमध्ये फूट ही नवी गोष्ट नाही. या आधी पाच वेळा काँग्रेस फुटली आहे. पहिल्यांदा काँग्रेस फोडली ती नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी. १९३९ मध्ये काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून ते निवडले गेले होते. मात्र, नेहरूंची माणसे त्यांना काम करू देत नव्हती. त्यामुळे बोस वैतागून बाहेर पडले. त्यावेळी पहिल्यांदा काँग्रेस फुटली होती. नेताजींनी पुढे स्वतःचा 'फॉरवर्ड ब्लॉक' नावाचा पक्ष स्थापन केला होता. काँग्रेस १४० वर्षे जुनी आहे. या १४० वर्षांत वेगवेगळ्या कारणांनी काँग्रेस फुटली. सध्या मल्लिकार्जुन खडगे अध्यक्ष आहेत, पण पडद्यामागून राहुल गांधीच सारी सूत्रे हलवतात. राहुल गांधी यांच्या संमतीशिवाय काँग्रेसमध्ये पानही हालत नाही. राहुलबाबाच्या नेतृत्वात लोकसभेच्या तीन निवडणुका काँग्रेस लढली. तिन्ही हरले. आता बिहार हरले. त्यांनी काँग्रेसचे काय हाल करून ठेवले आहेत ते देश जाणतो. काँग्रेसवालेही राहुलबाबाला कंटाळले आहेत, पण कोणी हिंमत करीत नाही. शशी थरूर अधूनमधून आवाज उठवतात, पण एकटे पडतात. काँग्रेसला पूर्णवेळ देणारा अध्यक्ष पाहिजे, असे काँग्रेसवाल्यांना वाटते. बिहार निवडणुकीच्या ऐन रणधुमाळीत राहुल गांधी विदेशात निघून गेले होते. राहुल गांधी यांच्या नेतृत्वात काँग्रेसने हरलेली बिहारची ही ९६ वी निवडणूक आहे. काँग्रेसमध्ये असंतोषाचा ज्वालामुखी धुमसतो आहे; पण बोलणार कोण? त्या पृष्ठभूमीवर नरेंद्र मोदी यांचे वक्तव्य महत्त्वाचे आहे. काँग्रेस फुटेल असे ते म्हणतात; कोण फोडेल?

गांधी कुटुंबातला माणूसच काँग्रेस फोडू शकतो. दुसऱ्या कोणात ती ताकद नाही. मग कोण आहे तो? एक आहे, प्रियांका गांधी-वढेरा काँग्रेस फोडू शकतात. प्रियांका या राहुल गांधी यांच्या भगिनी आहेत. सुरुवातीपासून प्रियांकाकडे दुर्लक्ष झालं. सोनिया गांधींनी मुलीला मागे ठेवले. राहुल गांधींना पुढे करण्यात आले. राहुलमुळे प्रियांकाला पुढे येऊ दिले गेले नाही. तीन वर्षांपूर्वी त्यांच्याकडे उत्तर प्रदेशची जबाबदारी देण्यात आली होती. तिथे मार मिळाला. त्यांच्या नेतृत्वात उत्तर प्रदेशच्या निवडणुकीत काँग्रेसला फक्त दोन जागा मिळाल्या. त्यानंतर त्या रिकाम्याच आहेत. बिहारच्या निवडणुकीतही कुठे चमकल्या नाहीत. म्हणायला त्या काँग्रेसच्या राष्ट्रीय सरचिटणीस आहेत; पण कुठलीही जबाबदारी नाही. देशातल्या लोकांना प्रियांका गांधींमध्ये इंदिरा गांधींचा भास होतो. राहुलबाबा या आपल्या



लाडक्या बहिणीला पुढेच घुसू देत नाहीत. प्रियांका यांचा पती रॉबर्ट वढेरा यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. त्यातून ढील मिळाली तर प्रियांका धूम करू शकतात. शेवटी त्यांनाही राजकीय महत्त्वाकांक्षा असणार. लालूप्रसाद यादव यांच्या कुटुंबात सुरू यादवी आपण पाहत आहोत. तिकडे तामिळनाडूमध्ये करुणानिधी परिवारात घमासान सुरू आहे. आपल्या महाराष्ट्रात काका-पुतण्यातला संघर्ष देशाने पाहिला. अजित पवारांनी काका शरद पवार यांचा राष्ट्रवादी पक्षच पळवला. मुख्यमंत्री होण्याच्या महत्त्वाकांक्षेपोटी उद्धव ठाकरे यांनी भाजपासारखा विश्वासू मित्र गमावला. तेव्हा राजकीय महत्त्वाकांक्षा अजब चीज आहे. ती काहीही करायला लावू शकते. आपल्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे प्रियांका यांना कळत नसेल का? कळते. पण वळेल तेव्हा काँग्रेसमध्ये महाभूकंप होईल.

महाराष्ट्रात सध्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. २ डिसेंबरला मतदान आहे. दुसऱ्या दिवशी निकाल हाती येतील. काय होणार या स्थानिक पातळीवरच्या निवडणुकांमध्ये? बिहारचा विरोधकांचा अजेंडा इकडे चालेल? मतदार याद्यांमधील घोळाच्या मुद्यावर ठाकरे बंधूंनी मुंबईत 'सत्याचा मोर्चा' नावाने एक मोर्चा काढला होता. याद्या दुरुस्त होत नाहीत तोवर निवडणुका होऊ देणार नाही, अशी गर्जना राज ठाकरे यांनी केली होती. तेच ठाकरे बंधू आज निमूटपणे आखाड्यात उतरले आहेत. स्वतःला हास्यास्पद करून घेतले आहे या विरोधकांनी. किती खोटे बोलावं? विश्वासार्हताच गमावून बसले आहेत आजचे विरोधक. विश्वास नसेल तेव्हा निवडणुका जिंकणे अवघड होते. उद्धव ठाकरे यांचेच उदाहरण घ्या. गेली २५ वर्षे मुंबई महापालिका घरची दुभती गाय समजत होते. आज दमछाक सुरू आहे. पाच वर्षांत शिवसेना आणि राष्ट्रवादीचे दोन तुकडे पडले. या दोघांच्या कुबड्या मिळायची मारामार आहे. भाजपाने दोन महिने आधीच निवडणुकीची तयारी सुरू केली. स्थानिक पातळीवर ज्याची ताकद जास्त त्याच्या नेतृत्वात महायुती लढेल, अन्यथा मैत्रीपूर्ण लढती होतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागेच जाहीर केले आहे. त्यामुळे निवडणुकीच्या रिंगणात मित्रपक्षही एकमेकांविरुद्ध लढत असल्याचे चित्र काही जागी आहे. पण निकालानंतर सर्वांनी महायुतीकडेच आले पाहिजे, अशी रणनीती आहे. मुंबई महापालिकेची निवडणूक लागायला नवे वर्ष उजाडले असेल. मुंबई महापालिकेची निवडणूक साऱ्याच राजकीय पक्षांनी प्रतिष्ठेची केली आहे. राजाचा जीव पोपटात असतो, अशी एक कथा आहे. तसा उद्धव ठाकरे यांचा जीव मुंबई महापालिकेत आहे. प्रथमच त्यांना मोठे आव्हान मिळाले आहे. लोकसभा निवडणुकीत शिवसेनेचे ९ खासदार निवडून आले होते. विधानसभा निवडणुकीत उद्धवसेना २० जागांवर थांबली. यातले १० आमदार एकट्या मुंबईतून निवडणूक आले आहेत. या अगोदर मुंबईसाठी २०१७ मध्ये निवडणूक झाली होती. तेव्हा युतीचे सरकार होते. पण भाजपा आणि अखंड शिवसेना वेगवेगळे लढले. शिवसेनेला ८४ जागा तर भाजपाला ८२ जागा जिंकता आल्या. मुंबईत एकूण २२७ वॉर्ड आहेत. बहुमतासाठी किमान ११४ नगरसेवक खिशात हवेत. भाजपकने तेव्हा रस दाखवला नाही म्हणून शिवसेनेने मुंबईत महापौर बसवला. यावेळी मात्र सर्कस आहे. महाविकास आघाडीमधला मित्रपक्ष काँग्रेसने स्वबळावर लढायचा निर्णय जाहीर केला आहे. ठाकरे सेनेचे ओझे काँग्रेसने उतरवले आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा अद्याप निर्णय व्हायचा आहे. पाच वर्षांपूर्वीची मुंबई आणि आजची मुंबई यात मोठा फरक आहे. आज मुंबईत भाजपाचे १५ आमदार आहेत तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे ६ आमदार आहेत. ठाकरे सेनेचे फक्त १०. काँग्रेस स्वतंत्र लढत असल्याने उद्धव राज ठाकरे यांच्या मनसेला सोबत घेऊ पाहत आहेत. सध्या मुंबईत मनसेचा कोणीही आमदार किंवा नगरसेवक नाही. महाराष्ट्र हित, मराठी अस्मिता, ठाकरे ब्रँड या जोरावर ठाकरे बंधू किती जोर मारू शकतील, हा प्रश्नच आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत काँग्रेस सोबत असल्याने ठाकरे सेना म्हणजे उबाठाला मुसलमानांची चांगली मतं मिळाली होती. आता ती मिळणार नाहीत. उद्धव यांच्यासाठी हा मोठा खड्डा असेल. राज ठाकरे हा खड्डा किती भरून देतात ते पाहायचे. मुळात राज ठाकरे यांनी अजून भावासोबत युतीची गोष्ट केलेली नाही. जागावाटपात किती आणि कोणत्या जागा वाट्याला येतात, ते पाहून राज ठाकरे निर्णय करतील असे दिसते. जागावाटपावर एकमत झाले नाही तर भावांची युती फिसकटूही शकते? ▮

९८२२२६२७३५

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## आजचे संघगीत-४९

शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर २०२५

### चला निघू या सरसावोनी देशाच्या उद्धरणी

चला निघू या सरसावोनी देशाच्या उद्धरणी ॥धृ.॥

विसकटलेले अवघे जीवन, खंत जयांना याची
पडती स्वप्ने उत्थानाची, उज्ज्वल भवितव्याची
जागरूक अभिमानी असले, असती जे जे कोणी ॥१॥

उधानलेल्या जलधीसंगे यावा झंझावात
तशी देउनी पराक्रमाला अभिमानाची साथ
परक्यांची या टाकू पुसुनी येथिल नावनिशाणी ॥२॥

त्रिखंडात दुमदुमुनी जावी जरि राष्ट्राची कीर्ती
कार्यमग्नता जीवन व्हावे मृत्यू ही विश्रांती
भेद विरावे स्फुरण चढावे नवशुभ आकांक्षांनी ॥३॥

ईर्ष्या अमुची कधी नसावी क्षणिक पुराचे पाणी
कसे व्हायचे अशी नसावी खचलेली जनवाणी
हासत जावे कात्यावरुनी तरुणांनी अनवाणी ॥४॥

उठता आपण नमतिल विघ्ने महाभयंकर आता
काय न केला आपण मर्दन तुंग हिमाचल माथा?
विलंब का मग आणू वैभव लीलेने जिंकोनी ॥५॥

## वाचक पत्रे

### निवडणूक सुरक्षा हीच राष्ट्रीय सुरक्षा

एसआयआर म्हणजे मतदारसूची अद्ययावत करून त्यांना अधिक निर्दोष आणि पारदर्शक करण्यासाठीची राष्ट्रीय मोहीम. बिहारमध्ये ही मोहीम अतिशय यशस्वी ठरली. लाखो अवैध नावे वगळल्याने मतदानाचा टक्का विक्रमी म्हणजे ६६.९० इतका वाढला. एवढे असतानाही अनेक विरोधी पक्ष या मोहिमेला तीव्र विरोध करताना दिसत आहेत. बंगाल आणि तामिळनाडू या राज्यांनी या मोहिमेला स्थगिती मिळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात सुद्धा धाव घेतली. परंतु सर्वोच्च न्यायालयाने ही मोहीम थांबवण्यास नकार देत लोकशाही टिकवण्यासाठी मतदारसूची शुद्ध ठेवणे अत्यावश्यक असल्याचे ठासून सांगितले. मतदारसूची अद्ययावत् करण्याचे काम मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यावर असते. अनेक राज्यात विशेषतः बंगालमध्ये या अधिकाऱ्यांना धमक्या दिल्या जात असल्याच्या तक्रारी मिळत आहेत.

विशिष्ट मतदारांची नावे ठेवणे अथवा वगळणे यासाठी दबाव टाकण्यात येत असल्याची बाब म्हणजे लोकशाही प्रक्रियेत राजकीय हस्तक्षेप आहे. बंगालमध्ये अनुमाने एक कोटीहून अधिक घुसखोर वास्तव्यास असल्याचे अनेक स्रोत सांगतात. ज्यामुळे मतदारसूचीची शुद्धता राखण्याचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. आज मतदारसूचीची शुद्धता, डिजिटल संरक्षण आणि मुक्त निष्पक्ष मतदान प्रक्रिया या गोष्टी केवळ प्रशासकीय नसून राष्ट्रीय सुरक्षा धोरणाचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. विरोधकांनी राजकीय हेतूपोटी एसआयआरला विरोध करण्याऐवजी लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांचा आदर करणे अपेक्षित आहे. भारताचा लोकशाही प्रवास मजबूत करायचा असेल, तर मतदारसूची शुद्ध ठेवणे, हिंसाचार रोखणे आणि निवडणूक आयोगावर विश्वास ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**संजय चौधरी**/९४२३३००४८५

● ● ● ●

### माझा भारत खरच महान होईल का?

'मेरा भारत महान' नक्कीच आहे; प्रत्येकाला त्याचा अभिमान वाटला पाहिजे; पण जेव्हा जेव्हा परदेश प्रवासाचा विचार येतो तेव्हा या मंत्राचा खोलवर विचार करावा लागतो. राजा आणि तत्सम व्यक्तींची कार्यशक्ती मानसिकता आणि भारतातील व्यक्ती आणि राजकीय संघटना यांच्या कार्यशक्ती मानसिकतेत खूप फरक आहे. त्यांच्याकडून शिस्त, स्वच्छता, आपुलकी, संस्कृतीचे धडे घेतले, तर मेरा भारत महान म्हणता येईल. आम्ही दारूच्या दुकानांना परवानगी देतो आणि त्या भागात दारूचे एकही दुकान नाही; ते तंबाखू, पान आणि धूर खाऊन रस्ते खराब आणि दुर्गंधीयुक्त करत नाही, कचरा उचलण्याची पद्धतशीर योजना आहे. त्यांच्या कोणत्याही प्रार्थनास्थळावर दानपेट्या नाहीत, पण आमच्याकडे दानपेट्यांची लूट सुरू आहे. वालुकामय क्षेत्रे असून लहान उद्याने आहेत. ही इच्छा आपण भारतीयांपर्यंत पोहोचवू शकत नाही का?

नक्कीच शक्य आहे व होईल सुद्धा; पण स्वातंत्र्यानंतर राज्यकर्त्यांमध्ये देशाचा विकास करण्याची इच्छाशक्ती असती तर भारत अधिक समृद्ध झाला असता. प्रत्येक व्यक्ती भारताला वंदे मातरम् म्हणून सुजलाम सुफलाम म्हणून वंदन करताना दिसली असती, आज तसे होत नाही. मी भारतीय आहे पण वंदे मातरम् म्हणणार नाही असे जेव्हा कोणत्याही धर्माचा, जातीचा राजकीय नेता सहज म्हणू शकतो आणि ते खपवून घेतले जाते तर आपण खरोखर महान कसे होणार? ▮

**अमोल करकरे** /९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक
### विना नोंदणी कार्यरत संस्थांविरुध्द होणार कारवाई

**परभणी,/प्रतिनिधी-** दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या समाज संघटना/ संस्थांना नोंदणी अनिवार्य असून नोंदणी पत्राशिवाय दिव्यांग क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांनी दि. ३० नोव्हेंबर २०२५ पूर्वी प्रस्ताव जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, सामाजिक न्याय भवन, परभणी येथे सादर करावे. अन्यथा संस्थेविरूध्द दिव्यांग व्यक्ति हक्क अधिनियम २०१६ च्या कलम ९१ अनुसार कारवाई करण्यात येईल. अशी सूचना जिल्हा परिषदेचे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी आर.व्हि. चकोर यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासन दिव्यांग व्यक्तींची प्रतिष्ठा, हक्क आणि सुरक्षा यांचे संरक्षण करण्यास दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या कलम ४९-५३ अनुसार दिव्यांगांच्या कल्याण, विकास, पुनवर्सन आणि सक्षमीकरण क्षेत्रात काम करणाऱ्या नागरी, समाज संघटना/संस्था महत्वपूर्ण भुमिका बजावतात. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या कलम ४९-५३ अनुसार दिव्यांगांच्या कल्याण, विकास पुनर्वसन आणि सक्षमीकरण क्षेत्रात काम करणाऱ्या नागरी समाज संघटनांची / संस्थांची नोंदणी अनिवार्य आहे.

विभागाच्या असे निदर्शनास आले आहे कि, दिव्यांग क्षेत्रात अनेक समाज संघटना/ संस्था अद्यापी वैध नोंदणी शिवाय कार्यरत आहेत. सदर बाब दिव्यांग व्यक्ति हक्क अधिनियम २०१६ च्या कलम ५० चे उल्लंघन करणारी आहे. विनानोंदणी संस्थांनी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, सामाजिक न्याय भवन, परभणी येथे प्रस्ताव सादर करावेत, कोणतीही व्यक्ती अथवा नागरी समाज संघटना/संस्था दिव्यांग क्षेत्रात नोंदणी शिवाय कार्य करू शकत नाही, असे श्री. चकोर यांनी स्पष्ट केले आहे.

### परभणी व हिंगोली जिल्ह्यात १३ डिसेंबरला राष्ट्रीय लोक अदालत

**परभणी/प्रतिनिधी-** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी यांच्यावतीने दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी परभणी व हिंगोली जिल्ह्यातील सर्व न्यालयालयात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये न्यायालयातील सर्व प्रकारची तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, भारतीय चलनक्षम दस्तऐवज अधिनियम १८८१ चेक बॉउन्स, बँक वसूली प्रकरणे, मोटार अपघातांची प्रकरणे, कौटुंबिक वादाची प्रकरणे, भू-संपादन प्रकरणे, वीज (चोरीची प्रकरणे वगळून) व पाणी आकार प्रकरणे, वेतन व भत्त्यांची सेवा विषयक प्रकरणे, महसूल, बँकेचे वसुली वादपुर्व दाखल प्रकरणे ठेवता येतात. १३ डिसेंबर रोजी आयोजित लोक अदालतमध्ये संबंधीत पक्षकार सहभाग घेऊन शकतात. लोक अदालतमध्ये प्रकरणात तडजोड करण्यासाठी माननीय न्यायाधीश व वकील यांचे पॅनल आपल्याला मदत करेल. यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही. लोक अदालतमध्ये प्रकरण तडजोडीने मिटल्यास दाखल कोर्ट फीस नियमानुसार परत मिळते. राष्ट्रीय लोक अदालतमध्ये जास्तीत जास्त तडजोड पात्र प्रकरणे ठेऊन तडजोडीने निकाली काढण्याचे आवाहन परभणी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्वला म. नंदेश्वर यांनी केले आहे.

ज्या पक्षकारांची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत आणि ज्यांना ती प्रकरणे तडजोडीने मिटविण्याची इच्छा आहे, त्यानी त्यांच्या विधीज्ञांशी संपर्क करावा. अथवा अधिक माहितीसाठी व आपले प्रकरण दिनांक १३ डिसेंबर रोजी आयोजीत लोक अदालतीमध्ये ठेवण्यासाठी आपल्या जवळच्या न्यायालयातील तालुका विधी सेवा समिती किंवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी यांच्याकडे संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव बी.एम. काळे यांनी केले आहे.

### सीसीआय कापूस खरेदी मर्यादा एकरी १२ क्किंटल करण्याची मागणी.- डॉ. संजय रोडगे

**सेलू,/प्रतिनिधी-** राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या सीसीआयच्या कापूस खरेदी प्रक्रियेत बदल करण्याची मागणी तीव्र झाली आहे. सद्यस्थितीत सीसीआयने प्रति एकर ५.६० क्किंटल इतकी मर्यादा निश्चित केली आहे. मात्र ही मर्यादा शेतकऱ्यांच्या वास्तविक उत्पादन क्षमतेपेक्षा अत्यल्प असल्याने त्यांच्यात तीव्र नाराजी पसरली आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती, सेलूचे सभापती डॉ. संजय रोडगे यांनी या संदर्भात सीसीआयच्या महाप्रबंधकांना तसेच राज्य शासनाला निवेदन देऊन कापूस खरेदीची मर्यादा एकरी १२ क्किंटलपर्यंत वाढविण्याची मागणी केली आहे. वाढत्या उत्पादन खर्च, हवामानातील अनिश्चितता आणि प्रत्यक्षात शेतकऱ्यांकडून घेतले जाणारे जास्त उत्पादन यांचा विचार करता विद्यमान मर्यादा शेतकऱ्यांच्या हिताविरुद्ध असल्याचे डॉ. रोडगे यांनी नमूद केले. शेतकऱ्यांकडून बाजार समितीकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी आणि निवेदने येत असल्यामुळे हा मुद्दा अधिक गंभीर झाला आहे. मर्यादा वाढल्यास शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळून आर्थिक स्थैर्य प्राप्त होईल, असे मत कृषी तज्ज्ञांनीही व्यक्त केले आहे. या मागणीला आता शेतकरी संघटनांकडूनही पाठिंबा मिळू लागला असून लवकरात लवकर निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी सर्वांची अपेक्षा आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# पाथरीतील भाजप पक्षाचा झेंडा घेऊन अपक्ष म्हणून निवडणूका लढविणार
# आत्मघातकी जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांची तातडीने उचलबांगडी करण्याची मागणी

**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी-** पाथरी नगरपालिकेंतर्गत नगराध्यक्षपदासह अन्य सदस्यपदाकरीता इच्छुक असणाऱ्या उमेदवारांना अंतीम मुदतीतसुध्दा पक्षाचा एबी फॉर्म वितरित न केल्याबद्दल भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांची पक्षश्रेष्ठींनी तातडीने उचलबांगडी करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या स्थानिक नेते मंडळींनी गुरुवारी पाथरी एका पत्रकार परिषदेतून केली.

नगराध्यक्षासह सदस्य पदाकरीता पक्षाचे इच्छुक उमेदवार हे पक्षाचा झेंडा खांद्यावर घेऊन अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवतील, अशी घोषणाही या नेतेमंडळींनी केली.

या जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या निवडणूका भारतीय जनता पक्षाने स्वबळावर लढविण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्या दृष्टीने इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीसुध्दा घेतल्या. पाथरीतील नगराध्यक्षपदासाठी पाच इच्छुकांनी व सदस्य पदाकरीता ५० इच्छुकांनी मुलाखती दिल्या. जिल्ह्यातील नेतेमंडळी यातून यथायोग्य असे उमेदवार निवडतील व एबी फॉर्म सुपूर्त करतील, हे अपेक्षित होते. परंतु, जिल्हाध्यक्ष भुमरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतीम मुदतीत म्हणजे १७ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजेपर्यंत या इच्छुकांना एबी फॉर्म उपलब्ध केलाच नाही. या प्रकाराने स्थानिक नेते व इच्छुक हे जी कमालीचे संतापले. जेव्हा जिल्ह्यातील काही नेतेमंडळी व जिल्हाध्यक्ष भुमरे यांनी स्थानिक पातळीवर कुठल्याही नेतेमंडळींसह इच्छुकांना विश्वासात न घेता नगराध्यक्षासह सदस्यांच्या सर्व जागा शिवसेनेस सोडावयाचा परस्परच निर्णय घेतला. पडद्याआडील, अंधारातील त्या तहाचा स्थानिक मंडळींना



थांगपत्तासुध्दा लागला नाही. त्यामुळेच कार्यकर्त्यात प्रचंड अशी नाराजी आहे, संताप आहे. एका रात्रीतूनच घडलेल्या या नाट्यमय घडामोडीमुळेच शहरात तब्बल १६ हजार हिंदु समाजबांधव भारतीय जनता पक्षाचा नगराध्यक्षासह सदस्यपदाकरीता उमेदवार नसल्यामुळे कमालीचे भडकले आहेत, सैरभैर झाले आहेत. मुस्लिम समाजातील उमेदवारांच्या पारड्यात मत टाकतांना पक्षाच्या मतदारांवर वेळ येऊन ठेपली आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया या संतप्त नेतेमंडळींनी व्यक्त केली व या निवडणूकीत पक्षाकडून इच्छुक असणारे सारे उमेदवार अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात उतरतील, असे या नेतेमंडळींनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, पूर्णा नगरपालिकेत माजी नगराध्यक्ष प्रशांत कापसे यांनी आपल्या मातोश्रींसाठी उमेदवारी मागितली होती. परंतु, त्यांना उमेदवारी बहाल करण्याऐवजी या पक्षातील श्रेष्ठींनी ऐनवेळी शिंदे गटास जागा सोडून दिली. याच शिंदे गटाने कापसे यांना उमेदवारी बहाल केली, असेही या नाराज नेतेमंडळींनी या पत्रकार परिषदेतून स्पष्ट केले. जिंतूरातसुध्दा राजेश वट्टमवार सारख्या भारतीय जनता पार्टीच्या निष्ठावान कार्यकर्त्यास स्थानिक पातळीवरील श्रेष्ठींच्या प्रखर विरोधामुळे शिवसेनेचे मशाल चिन्ह हातात घेऊन पक्षाविरोधातच बंड पुकारावे लागले, अशी खंतही या नेतेमंडळींनी व्यक्त केली.

## पेठशिवणी येथे जि.प. व पं. समिती बाबत भाजपाची संवाद बैठक

**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी:** तालुक्यातील पेठशिवणी येथे भाजपाचे गंगाखेड विधानसभा प्रमुख संतोष मुरकुटे यांच्यावतीने आगामी होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक संदर्भात कार्यकर्त्यांची संवाद बैठक दि. २० नोव्हेंबर रोजी पेठशिवणी येथे घेण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्ष स्थानी माजी जि. प. सदस्य गणेशराव रोकडे दादा उपस्थित होते.

व्यासपीठावर भाजपा जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, माजी जिल्हा अध्यक्ष, संतोष मुरकुटे विठ्ठलराव रबदडे, व्यंकटराव तांदळे, प्रदेश कार्यकारणी सदस्य लक्ष्मणराव रोकडे, लिंबाजीराव टोले, शिवाजीराव दिवटे, माजी जिप सदस्य भरत घनदाट,




सदाशिव आप्पा ढेले, गोपीनाथ तुडमे, कैलास रुद्रवार, रुपेश शिनगारे, नदु आप्पा बेलोरे, शहर अध्यक्ष पाडूरंग रोकडे, ता.आ. लाडगे यांच्या सह तालुक्यातील पदधिकारी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना संतोष मुरकुटे यांनी व्यक्त केले की सर्व मतभेद व गटतट बाजूला ठेऊन कमळ हाच आपला उमेदवार समजुन कार्यक्रत्यानी कामाला लागावे व सर्व कार्यकृते उमेदाराच्या पाठीशी ताकतिनीशी उभा आसल्याची गव्हॉई मुरकुटे यांनी दिली तसेच दि. २५ नोव्हेंबर रोजी अभिष्टचिंतन कार्यक्रम सोहळ्याला पेठशिवणी जिल्हा परिषद सर्कल मधील सर्व जनतेनी उपस्थित राहाण्याचे आव्हाण केले आहे. तर परभणी जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे पुढे बोलताना म्हणाले की पेठशिवणी जिल्हा परिषद पंचायत समिती संर्दभात महत्वाच्या उमेदवाराना निवडणुकीत संधी मिळण्यासाठी आपण कोणत्याही पक्षासोबत युती करणार नाहीत भाजप स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार असून परभणी जिल्ह्यातील सर्वच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या उमेदवाराची निशाणी कमळ चिन्ह असणार आहे. भाजपा कडे भक्कम पदाधिकाऱ्याची साथ असून कार्यकर्त्यांच्या बळावर परभणी जिल्ह्यातल जिल्हा परिषद व पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकवणार असल्याचे जाहीर केले. पेठशिवणी येथिल कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पदुदेवा जोशी पालमकर यांनी केले तर आभार प्रदर्शन भगवान करंजे यांनी मानले.

## नराधमाला फाशीची शिक्षा द्या-सुवर्णकार समाजाची मागणी

**संपत तेली**



**पूणा,/प्रतिनिधी-** मालेगाव( नाशिक )तालुक्यातील डोंगराळे येथील निष्पाप चिमुकली. कु. यज्ञा जगदीश दुसाने हिच्यावर अत्याचार करून निर्दयी हत्येचा १९ नोव्हेंबर बुधवार रोजी सुवर्णकार समाजाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला.या बाबत पूर्णा येथे सराफा बाजार बंद पाळून निवेदन देण्यात आले. हे कृत्य करणाऱ्या नराधमाला कठोरात कठोर शिक्षा, तात्काळ फाशी देणेच हा न्याय असू शकतो. या प्रकरणाची जलदगती सुनावणी करून आरोपीवर त्वरित कठोर कारवाई व्हायला करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. तहसीलदार माधव बोथीकर यांना या मागणीचे निवेदन देण्यात आले.या वेळी विविध राजकीय पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते. सराफा बाजार बंद या घटनेच्या निषेधार्थ पूर्णा सराफा व्यापाऱ्यांच्या वतीने बंद पाळण्यात आला.दिवसभर सराफा बाजार बंद होता.

## ४१ जणांना कारणे दाखवा नोटीस- मतदान अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न
### १६ नोव्हेंबर रोजी जिजाऊ सभागृहात प्रशिक्षण

**मानवत,/प्रतिनिधी-** मानवत नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शहरातील ३२९५५ मतदारांसाठी एकूण ३५ मतदान केंद्रे शाळा, महाविद्यालये आणि शासकीय कार्यालयांमध्ये स्थापित करण्यात आली आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी २०० मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नियुक्त मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रथम प्रशिक्षण दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी शहरातील जिजाऊ सभागृहात आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणास निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, निवडणूक निर्णय अधिकारी व तहसीलदार पांडुरंग माचेवाड, सहायक निवडणूक अधिकारी नायब तहसीलदार संजय खिल्लारे, जिल्हा सहआयुक्त तथा प्रभारी मुख्याधिकारी महेश गायकवाड यांच्यासह तहसील कार्यालय व नगरपालिकेतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

प्रशिक्षणास गैरहजर राहिलेल्या ४१ अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी माचेवाड यांनी दिली. पुढील प्रशिक्षण २४ नोव्हेंबर २०२५ रोजी याच ठिकाणी होणार असून, अनुपस्थित राहिल्यास राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल, अशी स्पष्ट सूचना त्यांनी दिली. निवडणूक प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये म्हणून सर्वांनी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

## पालम तालुक्याचे तहसिलदार वाघमारे यांचे कौतूक
## फार्मर आयडीला दिली सुमारे पाच हजार शेतकऱ्यांना मान्यता

### अनुदानापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना दिलासा

**पालम,/प्रतिनिधी :** तालुक्यामध्ये मागील काही महिन्यापूर्वी झालेली अतिवृष्टी अनुदाना साठी अँग्रीस्टक उपक्रमा अंतर्गत फार्मरआयडी नोंदणी राज्यशासनाने बंधनकारक केलीली आहे. यामुळे पालम तालुक्यातील शेतकरी फार्मर आयडी मुळे अनुदान पासुन वंचित राहिलेली होते फॉर्मर आयडी नोंदणीसाठी पालमच्या तहसिलदारची मान्यतेची आवकता मुळे ती प्रमाणित होत असते.

तहसीलदार वाघमारे हे काही खाजगी कारणास्तव दोन महिन्यापूर्वी रजेवर असलेल्या मुळे पालम तालुक्यातील मोठ्या प्रमाणात शेतकरी अतिवृष्टी अनुदानापासून वंचित राहिले होते परंतू काही दिवसापूर्वी कर्तव्यदक्ष तहसीलदार रुजू होताच पालम तालुक्यात ही सुमारे ५००० च्या वर फॉर्मर नौदणी तहसिलदार यांच्या मान्यतेसाठी प्रलंबित होते. परंतू नोव्हेंबर



पहिल्या आठवड्यात रुजू होताच तहसिलदार कैलासचंद्र वाघमारे यांनी शेतकऱ्याच्या या अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयाला प्रथम प्राधान्य देत सुमारे पाच हजार नोंदणीस मान्यता दिली आहे. यामुळे अनुदानापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून ज्यां शेतकऱ्याच्या नाव मधे बदल झालेला असून ज्यांच्या दुरुस्त्या करायच्या आहेत अशा फॉर्म आयडी आता अंदाजे सातशेच्या वर फार्मर आयडी नोंदणी तहसीलदार यांच्या मान्यतेसाठी प्रलंबित असून, ज्यांच्या नावात मोठ्या प्रमाणात विसंगती आहेत अशा शेतकऱ्यांनी आपले आधार कार्ड घेऊन तहसिल कार्यालयात हजर राहावे, असे आव्हान तहसिलदार कैलासचंद्र वाघमारे यांनी तालुक्यातील शेतकऱ्याला केले आहे.

यामुळे अनुदापासून वंचीत राहिलेल्या शेतकऱ्यांना फार्मर नोदणीला प्रथम प्राधान्य दिल्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या फॉर्मवर आयडीला प्रथम तहशिलदार याचे शेतकरी व नागरीकाच्या वतीने कौतुक करण्यात आले आहे.

## परभणी विधासभेतील सर्व गावातून आर.पी. हॉस्पिटल पर्यंत दररोज मोफत बस सेवा- आ.डॉ.राहुल पाटील यांचा उपक्रम, संबर येथून शुभारंभ

**परभणी ,/प्रतिनिधी-** परभणी विधासभेतील सर्व गावातून आर.पी. हॉस्पिटल पर्यंत दररोज मोफत बस सेवा आ.डॉ.राहुल पाटील यांचा उपक्रम, संबर येथून शुभारंभ परभणी : परभणी येथील आर. पी. हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या वतीने परभणी विधानसभा मतदार संघातील प्रत्येक गावातील रुग्णांसाठी दररोज मोफत बस सेवा सुरु करण्यात आली आहे. या मोफत बस सेवेचा शुभारंभ दि.१९ रोजी संबर येथे करण्यात आला. संबर येथून निघणाया बसमुळे या परिसरातील १२ गावातील रुग्णांना याचा लाभ होणार असून हॉस्पिटल पर्यंत सहज पोहचणे सुलभ होणार आहे. आ.डॉ.राहुल पाटील यांच्या आर.पी. हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये तपासणीसाठी येणाऱ्या सर्व रुग्णांचीमोफत तपासणी केली जाते. त्यासोबतच अत्यल्प दरात विविध शस्त्रक्रिया, उपचार केले जातात. अत्याधुनीक व कमी खर्चात उपचार होत असल्यानेरुग्णालयात एमआरआय, सिटी स्कॅन, सोनोग्राफी, एक्सरे, मोतीबिंदू शस्त्रक्रीया आदींसाठी रुग्णांची मोठी गर्दी होत आहे. परंतू ग्रामीण भागातून रूग्णालयात येणाया सामान्य नागरीकांचा १५० ते २०० रूपयांचा खर्च व वेळेचा अपव्यय होत होता. या गोष्टीची दखल घेत व सामाजिक बांधिलकीतून आ.डॉ. पाटील यांनी परभणी विधानसभेतील प्रत्येक गावातून रूग्णालया पर्यंत दररोज मोफत बस सेवेचा शुभारंभ केला आहे. यापूर्वी परभणी शहर व झिरोफाटा येथून रूग्णांसाठी



दररोज मोफत बससेवा सुरु आहे.प्रत्येक गावातून ही बससेवा सुरु होणार आहे. संबर येथुन निघणाया बससेवेचा लाभ या परिसरातील सावंगी खुर्द, जोड परळी, बोबडे टाकळी, पिंगळी कोथाळा, साडेगाव, वाडीदमई, झरी, खानापूर, नांदापूर, टाकळी कुंभकर्ण, धर्मापुरी या गावातील रुग्णांना होणार आहे. या बस सेवेचा शुभारंभ संबर येथे करण्यात आला. यावेळी महादभारती, गुरुज्ञान भारती महाराज, एकलव्य महाराज, महानगर प्रमुख डॉ. विवेक नावंदर यांच्यासह उपजिल्हाप्रमुख सदाशिव देशमुख, विधानसभा प्रमुख डॉ.दिनेश बोबडे, प्रभाकर जयस्वाल, किशोर देशमुख, युवासेना तालुका प्रमुख संदीप झाडे, तालुका संघटक बंडू नाना बिडकर, अण्णासाहेब बोबडे, डॉ. चव्हाण, गंगाधरराव मोरे, गोपीनाथ झाडे, उत्तम मुळे, भास्कर देवडे, सुभाष व्यवहारे, आनंद देवडे, बबन नाईक, शंकर बनसोडे, ब्रह्मानंद सावंत, आबासाहेब चौधरी, सोपान आरमळ, संदीप टेकाळे, दत्तराव मोहिते, दतराव तरवटे, माधव गायकवाड, बापू रसाळ, प्रसाद चांदणे, मुरलीधर रसाळ, नितीन देशमुख, गजानन सामाले, चेअरमन बालासाहेब, नितीन कदम, पंढरीनाथ घुले, मकरंद कुलकर्णी, बाळू पाटील, अरुण टेकाळे, मारुती चव्हाण, सुदाम चव्हाण, प्रभाकर चव्हाण, बाबुराव पवार, राजू बोबडे, गजानन पंढरकर, तुषार काळे, प्रसादराव काळे, पंकज काळे, मधुकर काळे, सुरेश बोबडे, हनुमान बोबडे, कल्याण बोबडे, विलास बोबडे, माऊली बोबडे, प्रभाकर बोबडे, बबन बोबडे, उद्धव भालेराव आणि समस्त गावकरी मंडळी उपस्थित होते.

# पाचोंदा दुहेरी हत्याकांडातील दोन आरोपींना अटक

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २१ नोव्हेंबर-**

कापूस वेचणीसाठी गेलेल्या दोन सख्या जावांच्या खुनाचा उलगडा स्थानिक गुन्हे शाखेने बारा तासाच्या आत केला असून, दोन आरोपींना अटक केली आहे.

माहूर तालुक्यातील पाचोंदा शिवारात दि.२० रोजी अंतकलाबाई अशोक अडागळे (६०) आणि अनुसयाबाई साहेबराव अडागळे (४५) सकाळी आप आपल्या शेतात कापूस वेचण्याकरीता गेल्या होत्या. दोघीचे शेत शेजारीच लागून आहे. सायकाळी ४ वाजताच्या दरम्यान अडागळे शेतात गेले असता त्यांना दोघीही मृत्त अवस्थेत दिसल्या व दोघीच्याही



अंगावरील सोन्याचे दांगीने लंपास होते.

या घटनेमुळे तालुक्यात खळबळ उडाली होती. गुन्ह्याचे गांभिर्य पाहता जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्यासह अन्य पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देवून स्थानिक गुन्हे शाखेस सूचना देण्यात आल्या. स्थानिक गुन्हे शाखेने या तपासासाठी चार पथके तैनात केली. एक पथक आदिलाबाद, एक यवतमाळ तसेच दोन पथके उपविभाग माहूर व किनवट येथे पाठविण्यात आले. आरोपीचा शोध घेण्यासाठी तात्काळ माहिती हस्तगत करुन तज्ज्ञाव्दारे स्केच तयार करण्यात आले. याच अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे, पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे, किनवट, माहूर उपविभागात शोध घेत असताना आज दि.२१ नोव्हेंबर रोजी सहायक पोलीस निरीक्षक यांना मिळालेल्या माहितीनुसार संशयित आरोपी दत्ता सुरेश लिंगलवार रा.सदोबा सावळी ता.आर्णी हा गंगाजीनगर सेलू करंजी ता.माहूर येथे नातेवाईकाच्या शेतातील आखाड्यावर लपून बसला असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून दत्ता लिंगलवार यास अटक केली. त्याची चौकशी केली असता त्याने हा गुन्हा त्याचा मित्र गजानन गंगाराम येरजवार याच्या मदतीने केला असल्याचे सांगितले. या माहितीवरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गजानन येरजवार यासही अटक केली. या दोघांनीही खुनाची कबुली दिली असून, गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल, दोन मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. हा तपास करण्यासाठी यवतमाळ पोलिसांनी देखील सहकार्य केले.

# ग्रामसेवकांच्या कारभारास वैतागली जनता

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २१ नोव्हेंबर-**

हदगाव तालुक्यात एकूण १२५ ग्रामपंचायत संख्या आहेत ज्यात ग्रामसेवक संख्या १०८ असल्याकारणाने नेमून दिलेल्या गावात ग्रामसेवक हजर राहत नसल्याने सर्व सामान्य जनतेची कामे वेळेवर होत नसल्याची तक्रार मोठ्या प्रमाणावर होत असल्याने याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

हदगाव तालुक्यातील अनेक ग्रामसेवक कर्मचारी हे हदगाव शहरात बसून कारभार पाहत आहेत तर काही ग्रामसेवक हे जिल्ह्याच्या ठिकाणी राहत असल्याची दबक्या आवाजात नागरिकांमधून चर्चा होत आहे. मुख्यालय राहत नाही परिणामी ग्रामीण भागातल्या सर्वसामान्य नागरिकांसमोर अनेक समस्या निर्माण होत आहेत. नमुना नंबर ८, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र सह विविध प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सामान्य जनतेला हदगावला यावे लागत आहे. सदरील ग्रामसेवक हे नेमून दिलेल्या गावात नियमित येत नसल्यामुळे अनेकांना तर आपला गावचा ग्रामसेवक कोण आहे? याची विचारणा करावी लागत आहे. संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांचे नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे. हदगाव पंचायत समितीला आठवड्यातून एक वेळा ग्रामसेवक कर्मचारी आढळून येतात दौऱ्याच्या नावाखाली वैयक्तिक कामाकडे अधिक लक्ष देत असल्याचे दिसून येते. एका ग्रामसेवकाकडे अधिक ग्रामपंचायतचे प्रभार असल्याने कामानिमित्त फोन लावल्यास उडवा उडवीचे उत्तरे भेटतात विविध योजनेची माहिती ग्रामसेवकाकडून गावातल्या नागरिकांपर्यंत मिळत नसल्यामुळे विविध योजना पासून सामान्य नागरिकांना वंचित राहावे लागत आहे. संबंधित गट विकास अधिकारी व ग्रामसेवक यांचे आर्थिक हितसंबंध असल्यानेच ग्रामसेवक आपल्या मर्जीनुसार सेवा बजावत असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष घालून कामचुकार ग्रामसेवकांवर कडक कारवाई करावी अशी मागणी ग्रामीण भागातील नागरिकांमधून होत आहे.

## बालिकेवर अत्याचार करणाऱ्या नराधमास पोलीस कोठडी

**नांदेड** -नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथील एका चिमुरड्या मुलीवर झालेल्या अत्याचाराची घटना ताजी असतांनाच नांदेड शह२रातील एका इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दुसऱ्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या मुलीवर त्याच शाळेत शिकविणाऱ्या नराधम शिक्षकाने जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली.या शिक्षकाला पोलीसांनी अटक केली असुन आज त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. याबाबत पोलीस सूत्रानी दिलेल्या माहितीनुसार शहरातील एका इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दुसऱ्या वर्गात शिकणाऱ्या मुलीवर इशांत लोखंडे या शिक्षकाने १९ नोव्हेंबर रोजी शाळेच्या आवारात लैंगिक अत्याचार केला. दुसऱ्या दिवशी आपली मुलगी शाळेत का जात नाही ही बाब मुलीच्या आईने त्या पीडित बालिकेला विचारली असता घडलेला सर्व प्रकार आपल्या आईला त्या मुलीने सांगितला. याबाबत पीडित बालिकेच्या आईने याबाबत भाग्यनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात पिडीत बालिकेच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरुन पोस्को कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या शिक्षकाला पोलीसांनी अटक केली असुन आज त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

# नियोजित टोल नाक्यावर अपघातात एकाचा बळी

## रुद्राणी कन्स्ट्रक्शनवर गुन्हा दाखल; तामसा येथील घटना

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ नोव्हेंबर-**

अर्धापूर ते तामसा राष्ट्रीय महामार्गावर तामसा नजीक नियोजित टोल नाक्यावर रुद्राणी कन्स्ट्रक्शनच्या हलगर्जीपणामुळे पर्यायी रस्ता न काढता रस्त्यावर टाकण्यात आलेले 'क्रॅश बॅरियर'ला टक्करून मोटरसायकलचा अपघात झाला. त्यात मोटारसायकल चालकाचा जागीच मृत्यू झाला असून रुद्राणी कन्स्ट्रक्शन व प्रोजेक्ट मॅनेजरवर मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्याची घटना दि. २१ रोजी शुक्रवारी मध्यरात्री एक वाजतानंतर घडली.

अर्धापूर ते तामसा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ (आय) महामार्गावर तामसा नजीक टोलनाका उभारण्याचे काम एक वर्षापासून कासवगतीने सुरु आहे. टोलनाका उभारण्याचे काम सुरु असताना रुद्राणी कन्स्ट्रक्शनकडून कोणत्याही प्रकारचा पर्यायी रस्ता, दिशादर्शक चिन्ह, काम चालू असल्याचे दिशादर्शक बोर्ड, बॅरिकेट्स, बॅनर, रेडियम लावून वाहनचालकांना धोक्याचा इशारा देणाऱ्या कसल्याच निशाण्या, पाट्या लावलेल्या नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांना रस्त्यावरील वाहतुकीत येणारे अडथळे दिसत नसल्याने अपघात घडले आहेत. दि. २१ रोजी रात्री अंदाजे एक वाजताचे सुमारास घडली आहे. तामसा येथील 'आंध्रा' इडली सेंटरचे मालक सतीश सुरेश बारसे (वय ३६) राहणार बारसगाव ता. अर्धापूर हे मोटारसायकल क्रमांक एम. एच. -२० एफ. बी. ८४७७ वरून गुरुवारी रात्री नांदेडहून हॉटेलचे साहित्य खरेदी करून तामस्याकडे येत होते. राष्ट्रीय महामार्गावर तामसा नजीक नियोजित टोलनाक्याचे काम सुरू असल्याने रस्त्यावरच ठेवण्यात आलेले सिमेंटचे प्लेट 'क्रॅश बॅरियर' ठेवलेले त्यांना दिसले नसल्याने त्यावर मोटारसायकल धडकल्याने मोठा अपघात झाला. त्यातच चालक सतीश बारसे यांचा जागीच मृत्यू झाला. मयताचा भाऊ माणिक सुरेश बारसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तामसा पोलीस ठाण्यात रुद्राणी कन्स्ट्रक्शन कंपनी छत्रपती संभाजीनगर व कंपनीचे सिनिअर प्रोजेक्ट मॅनेजर धोंडीराम जांभळे यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या आदेशान्वये प्रभाग २० मधुन डी.के.कांबळे लागले कामाला

**नांदेड**-आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने झालेल्या



बैठकीत लोहा कंधार तालुक्याचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर व माजी आमदार मोहनराव हंबर्डे यांच्या आदेशान्वये सामाजिक कार्यकर्ते डी के कांबळे कलंबरकर हे प्रभाग २० मधून निवडणूक लढवणार असल्याने ते प्रभागात मतदारांशी भेटीगाठीच्या कामाला लागले आहेत. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणुका २०२५ तोंडावर आल्याने सिडको प्रभाग क्रमांक २० मधून अनुसुचित जाती महिला प्रवर्गातून डी. के.कांबळे यांच्या पत्नी सौ. संघमित्रा दिलीप कांबळे ह्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आपले नशीब आजमावणार आहेत.यावेळी बरेच उमेदवार गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेली दिसून येत आहेत. पण इतरही अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत.तरी सामाजिक कार्याची दखल घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांनी प्रभाग क्रमांक २० मधून सामाजिक कार्यकर्ते डी के कांबळे कलंबरकर यांना निवडणूक लढवण्याचे आदेश दिल्याने ते आता रिंगणात उतरले आहेत.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे काम एकनिष्ठेने करत असल्याने पक्षश्रेष्ठींने त्यांना सध्या तरी कामाला लावलेले असल्याचे दिसून येते.

# हिमायतनगर नगरपंचायत निवडणूक रणसंग्रामात तणाव शिगेला

## ठाकरे सेनेचे माजी नगराध्यक्ष कुणाल राठोड व राष्ट्रवादी (अजितदादा गट) मोहम्मद जावेद यांच्यात उमेदवारी मागे घेण्यावरून गोंधळ

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २१ नोव्हेंबर-**

हिमायतनगर नगरपंचायत निवडणुकीला सुरुवात होताच राजकीय वातावरण तापले असून, आज दिनांक २१ नोव्हेंबर रोजी उमेदवारी मागे घेण्याच्या प्रक्रियेदरम्यान ठाकरे सेनेचे माजी नगराध्यक्ष कुणाल राठोड आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) यांचे नेते मोहम्मद जावेद यांच्यात जोरदार तणाव निर्माण झाला.

शहरातील १७ नगरसेवक आणि एक नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक होत असताना, नामांकन परत घेण्याच्या दिवशी वार्ड क्रमांक



९ मध्ये मोठा गोंधळ झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. राष्ट्रवादीचे उमेदवार पांचमासे यांना अर्ज मागे घ्यायला लावला असा आरोप होत असल्याने परिस्थिती चिघळली. ठाकरे व राष्ट्रवादी दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद, धक्काबुक्की व गदारोळ झाल्याचे चित्र तहसील कार्यालय परिसरात पाहायला मिळाले.

ही संपूर्ण घटना सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून, नागरिकांमध्येही या घटनेची चर्चा जोरात रंगली आहे. उमेदवारी मागे घेण्यावरून सुरू झालेला वाद आता राजकीय मतभेद टोकाला पोहोचल्याचे स्पष्ट दिसत आहे. निवडणुकीचा प्रचार अजून वेग घेण्याआधीच संघर्षाच्या ठिणग्या पडल्याने आगामी दिवसांत हिमायतनगरचे राजकारण आणखी तापणार आहे. दरम्यान, आज काँग्रेसमधील नाराज नेते व कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात दाखल केलेल्या अपक्ष उमेदवारी अर्जावर पक्षाने मनधरणी करून नियंत्रण मिळवले असून, अनेकांनी अर्ज मागे घेतले आहेत. त्यामुळे हिमायतनगरच्या निवडणुकीत आता चौरंगी लढतीची शक्यता बळावली आहे.

ही बातमी लिहीपर्यंत किती उमेदवारांनी अर्ज मागे घेतले याबाबत अंतिम आकडे उपलब्ध नसले तरी प्रमुख राजकीय पक्षांनी आपल्या नाराज उमेदवारांना अखाड्यातून बाहेर काढण्यात मोठे यश मिळवल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे त्यांच्या बाजूने समीकरणे अधिक मजबूत होण्यास मदत मिळणार आहे. एकूणच, हिमायतनगर नगरपंचायत निवडणूक थराराच्या उंबरठ्यावर पोहोचली असून, सुरुवातीलाच उडालेला राजकीय ठिणगीसारखा संघर्ष निवडणुकीत रंगत आणणार हे निश्चित!

## अध्यक्षपदासाठी १० तर नगरसेवक पदासाठी ८८ उमेदवार रिंगणात

**मुदखेड** -मुदखेड नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत अध्यक्षपदासाठी दि. २१ नोव्हेंबर रोजी नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी १५ जणांपैकी एकूण पाच जणांनी माघार घेतली आणि दहा प्रभागातून





एकूण ३५ जणांनी माघार घेतल्यामुळे आता एकूण दहा प्रभागातून ८८ उमेदवार रिंगणात असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार डॉक्टर आनंद यांनी पत्रकारांना बोलताना दिली. नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी नगराध्यक्ष पदासाठी एकूण १५ जणांपैकी आज दि.२१ रोजी शिवसेना (उबाठा) पक्षाकडून कल्याणी अविनाश झमकडे यांनी तर अपक्ष असलेल्या अर्चना किरण देशपांडे, जनाबाई गोविदराव नातेवाड, सविता किशोर पारवेकर, बिल्कीस फातेमा अब्दूल सत्तार आज रोजी माघार घेतली आहेत. एकूण दहा प्रभागातून १२३ उमेदवार रिंगणात होते दि.२१ नोव्हेंबर रोजी ३५ जणांनी प्रामुख्याने अपक्षांनी नामनिर्देशन पत्र मागे घेतल्यामुळे निवडणुकीत ८८ उमेदवार राहणार असल्याची माहिती देण्यात आली आणि शहरात एकूण २१,०४९ मतदार असून एकूण २५ मतदान केंद्राची स्थापना करण्याची माहिती यावेळी देण्यात आली याप्रसंगी सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा नायब तहसीलदार मारोतराव जगताप आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी जगदीश दळवी यावेळी उपस्थित होते.

# ग्रामीणच्या बीएमआयटी रजिस्ट्रेशन प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ नोव्हेंबर-**

विष्णूपुरी येथील ग्रामीण टेक्निकल अँन्ड मॅनेजमेंट कॅम्पस मधिल बीएमएलटी, बीएमआयटी या अभ्यासक्रमाला रजिस्ट्रेशन नंबर नसल्याने शिक्षण पुर्ण होऊनही विद्यार्थ्यांना नोकरी भरतीसाठी अर्ज करता येत नाहीत व पदवी प्रमाणपत्रही मिळाले नाहीत. यामुळे अनेक वर्षापासून उत्तीर्ण होऊनही विद्यार्थी अडचणीत आले आहेत. दरम्यान विद्यार्थी काँग्रेस एनएसयूआयचे जिल्हाध्यक्ष सुरज शिंदे यांनी ग्रामीणच्या विद्यार्थ्यांना घेऊन गुरुवार (ता.२०) रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे ग्रामीणच्या चौकशीची निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

विष्णूपुरी येथील ग्रामीण पॉलीटेक्निक कॉलेज येथे बीएमएलटी आणि बीएमआयटी हे अभ्यासक्रम सुरू आहेत, मात्र या अभ्यासक्रमास रजिस्ट्रेशन नसल्याने अभ्यासक्रम उत्तीर्ण होऊनही नोकरी भरतीसाठी अर्ज करण्याकरीता विद्यार्थी अपात्र होत आहेत. विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र मिळत नाहीत. तरी देखील विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळत सरसपणे ग्रामीण कॉँलेज येथे बीएमएलटी आणि बीएमआयटी हे अभ्यासक्रम सुरू आहेत. ह्या बाबींची सखोल चौकशी व्हावी. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना न्याय मिळावा आणि गैरप्रकारणी ग्रामीण कॉँलेज विरोधात कार्यवाही करुन कॉँलेजची मान्यता रद्द करावी अशी मागणी विद्यार्थी कॉँग्रेस एनएसयूआय जिल्हाध्यक्ष सुरज पाटील शिंदे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनातून केली आहे. यावेळी ग्रामीण कॉँलेजचे बीएमएलटी, बीएमआयटी अभ्यासक्रमाचे शेकडो विद्यार्थी उपस्थित होते.

# ग्रामीण भागात मानव विकास मिशनची बससेवा सुरू करा : पिंटू पाटील

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र शासनाच्या मानव विकास मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसह विशेषतः मुलींना शाळेपर्यंत मोफत व सुरक्षित पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (चडठढउ) द्वारे चालवली जाणारी मानव विकास मिशनची बस सेवा माहूर तालुक्यातील शेलू, गंगाजी नगर, करंजी, मनीरामखेड, लोकरवाडी, सिंदखेड आणि गोंडवडसा या परिसरातून सुरू करण्यात यावी,अशी मागणी शिवसेनेचे युवा नेते लक्ष्मीकांत ऊर्फ पिंटू पाटील वायफणीकर यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि विभागीय वाहतूक नियंत्रक, नांदेड यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

माहूर तालुक्यातील ग्रामीण भागातील राष्ट्रीय व राज्य महामार्गापासून दूरवर असलेल्या सेलू,करंजी, गंगाजीनगर,मनिरामखेड,लोकरवाडी, सिंदखेड आणि गोंडवडसा या गावपरिसरातील मार्गावर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बससेवा पूर्णपणे ठप्प असून विद्यार्थ्यांना उशिरा शाळामहाविद्यालयात पोहोचणे, वाढता वाहतूक खर्च आणि असुरक्षित प्रवास अशा अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या मार्गावर मानव विकास मिशनच्या बस फेऱ्यांची अत्यंत आवश्यकता आहे.

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह विशेषतः मुलींना इयत्ता १२वी पर्यंत शिक्षण घेता यावे यासाठी त्यांच्या गावापासून शाळेपर्यंत सुरक्षित आणि मोफत वाहतूक सुविधा देण्यासाठी या मार्गावर मानव विकास मिशनच्या बस फेऱ्यांची अत्यंत आवश्यकता आहे. ज्यामुळे त्या शाळेतील शिक्षण पूर्ण करू शकतील. या भागातील मुलींना शाळेपर्यंत पोहोचवण्यासाठी मोफत वाहतूक सुविधा पुरविण्यात आल्यास त्या शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात राहतील व शिक्षण सोडणार नाहीत.या भागातील मुली, विशेषतः ज्यांना शाळा लांब असल्याने शिक्षणात अडचणी येत असल्याची कैफियत निवेदनातून पिंटू पाटील यांनी संबंधित प्रशासनापुढे मांडली आहे. काही दिवसांपूर्वी पिंटू पाटील वायफनीकर यांच्या मागणीवरून आमदार हेमंत पाटील यांनीही आगारप्रमुख किनवट, माहूर आणि विभाग नियंत्रकांना सदरील मार्गावर मानव विकास मिशनची बस सेवा तात्काळ सुरू करून विद्यार्थ्यांची गैरसोय टाळावी अशा आशयाचे पत्र दिले होते. परंतु , अद्यापही या मार्गावर बस फेरी सुरू झाली नसल्याने विद्यार्थ्यांना असुविधेचा सामना करावा लागत आहे.

स्थानिक नागरिक, पालक आणि विद्यार्थी यांनीही या मागणीला मोठा पाठिंबा देत या मार्गावर मानव विकास मिशनची बससेवा त्वरित सुरू करण्याची जोरदार मागणी केली आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासनाने तत्काळ निर्णय घ्यावा, अशी सामूहिक अपेक्षा व्यक्त केली जात असून या मार्गावरून माहूरला शिक्षणासाठी येणाऱ्या मुलींची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने शासनाने त्यांच्या सुरक्षिततेसाठी तत्काळ मानव विकास मिशनच्या बस फेऱ्या सुरू कराव्यात, अशी मागणी पिंटू पाटील वायफणीकर यांनी सर्व संबंधितांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## भाजपा कार्यकर्ते धीरज स्वामी यांच्या पत्नी प्रभाग क्रमांक २० मधून इच्छुक



**नवीन नांदेड**-भारतीय जनता पार्टीचे एकनिष्ठ कार्यकर्ते व भाजपचे विविध पदावरून कार्यरत असलेले धीरज स्वामी आगामी मनपाच्या निवडणुकीत ओबीसी महिलासाठी प्रभाग क्रमांक २० मधून इच्छुक असल्याने ओबीसी महिला प्रवर्गातून त्यांच्या सौ प्रतिभा धीरज स्वामी ह्या निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत. नांदेड महानगरपालिका निवडणूक २०२५ तोंडावर आल्याने सिडको प्रभाग क्रमांक २० मधून ओबीसी महिला प्रवर्गातून बरेच उमेदवार गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेली दिसून येत आहेत. इतर ओबीसी कार्यकर्त्यांचा नेत्यांचे स्वागत करणे यांच्या व्यतिरिक्त कुठलेही सामाजिक कार्य नसल्याचे परिसरात बोलले जाते.पण धीरज स्वामी गेल्या अनेक वर्षापासून भारतीय जनता पार्टीचे काम एकनिष्ठेने करत असून त्यांनी दोन वेळा सिडको मंडळ अध्यक्ष, युवा मोर्चा अध्यक्ष पदावरून काम केले आहे. आणि सध्या जिल्हा प्रवक्ता या पदावर कार्यरत आहेत. सध्या सिडको हडको येथे कार्यरत असलेले भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते यांना देखील भाजपच्या प्रवाहात आणण्याचे काम केले आहे. तेव्हा पक्षश्रेष्ठीने अशा कार्यकर्त्यास संधी द्यावी अशी मागणी परिसरातून होत आहे.

# बांधकाम विभागाच्या नोटीसला अतिक्रमण धारकांकडून केराची टोपली

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ नोव्हेंबर-**

नांदेड ते बिदर फूलवळ मार्गे जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० रस्त्यालगत असे अतिक्रमण काढून घेण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रत्येक अतिक्रमण धारकांना नोटीसा देऊन येत्या दहा दिवसांमध्ये अतिक्रमण काढून घेण्यास सांगितले. परंतु या नोटीसीचा अतिक्रमण धारकांवर कसल्याच प्रकारचा परिणाम दिसून येत नाही. अतिक्रमण काढून घेण्यासाठी दहा दिवसाचा कालावधी देण्यात आला होता हा कालावधी संपून जवळपास एक महिना होत आला तरीही अद्यापही अतिक्रमण काढण्यात आले नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाला फक्त नोटीस देण्याइतकाच वेळ मिळाला होता का ? हा ही प्रश्न येतील समस्त गावकऱ्यांना पडलेल्या दिसून येत आहे. विभागाने जशी नोटीस देण्याची तत्पर दाखवली तशीच तात्पर्तता अतिक्रमण काढण्यास का दाखवत नाही.





गेल्या चार वर्षापासून फूलवळ येथील रोडचे काम अर्धवट अवस्थेमध्ये सोडून गुत्तेदार पळून गेले आहे. या अर्धवट राहिलेल्या कामामुळे येथे नेहमीच छोटे-मोठे अपघात होत असतात. येथे एखादी मोठी जीवितहानी झाल्या शिवाय सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग येणार नाही का असाही प्रश्न निर्माण होतो ?

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून फुलवळ येथील रस्त्याच्या लगत अतिक्रमण करणाऱ्या नागरिकांना नोटीस काढून रस्त्याच्या मध्यरेषेपासून १५ मीटर अंतरावरील अतिक्रमण काढण्याच्या सूचना केल्या आहेत. मात्र येथे कोणत्याच अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण काढण्याची तात्परता दाखवली नाही. फुलवळ येथील राहिलेलाअर्धवट रस्ता करून अतिक्रमण काढून या रस्त्याचा वाहतूक कोंडीचा प्रश्न मिटेल का? असा प्रश्न आता सुज्ञ नागरिकांच्याकडून उपस्थित केला जात आहे.

तर या उलट काही नागरिकांनी याच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवर अतिक्रमने करून करोडो रुपयांची उलाढाल केली आहे. काहींनी त्यावर व्यावसायिक गाळे काढून मोठ्या प्रमाणावर आर्थिक माया जमवली आहे. ते तर अजूनही अतिक्रमने काढण्यास धजावत नसल्याचे दिसून येत आहे. जशी या अतिक्रमण केलेल्या जागा स्वतःच्या मालकीच्या आहेत अशा अविर्भावात काही स्थानिक नागरिक आल्याचे प्रथमदर्शी दिसते आहे.

नांदेड बिदर राष्ट्रीय महामार्ग फूलवळ गावातून गेल्याने नागरिकांना उदगीर, लातूर,नांदेड येण्या-जाण्यासाठी हा मार्ग अत्यंत जवळचा व सोयीचा बनला आहे.

मोठ्या प्रतीक्षेनंतर होत असलेल्या या राष्ट्रीय महामार्गाचे काम दर्जेदार व्हावे अशी अपेक्षा येथील नागरिकांची होती. मात्र काही दिवसातच या रस्त्याच्या अवस्थेमुळे कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला जात आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी साहेब दर्जेदार रस्ते करा अन्यथा कारवाई करू अशी तंबी वारंवार सार्वजनिक बांधकाम विभाग आणि गुत्तेदारांना देत असतात, मात्र या तंबीनंतरही यांना काहीच फरक पडलेला दिसून येत नाही

# हिंगोलीत चार नगराध्यक्षपदाच्या तर २७ नगरसेवक पदाच्या उमेदवारांचे उमेदवारी अर्ज मागे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ नोव्हेंबर**

हिंगोली नगर पालिका निवडणुकीत सार्वत्रिक निवडणुकीत दि २१ नोव्हेंबर रोजी ४ नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांनी तर २७ नगरसेवक पदाच्या उमेदवारांनी माघार घेतली असून निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले असून भाजप, शिवसेना शिंदे गट आणि महाविकास आघाडी यांच्यात खरी लढत होणार असल्याचे दिसत आहे. या तिरंगी लढतीत कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शुक्रवारी उपविभागीय कार्यालयात उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भूजबळ, मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांच्या उपस्थितीत नगर पालिका उमेदवारांची अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असल्यामुळे मोठी गर्दी झाली होती. नगराध्यक्षपदासाठी आता रिंगणात शिंदे शिवसेनेच्या रेखा श्रीराम बांगर, भाजपच्या नीता बाबाराव बांगर, राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या अमीनाबी शेख अजीज प्यारेवाले, महाविकास आघाडीच्या अर्चना श्रीराम भिसे, सारीका अभिजीत अवघड यांचा समावेश आहे. तर नगरसेवक पदासाठी प्रभाग १ अ मधून शोभा अशोकराव कळासरे, सुनीता विठ्ठल सुर्यवंशी, भारतीबाई प्रभाकर थोरात, प्रभाग १ ब मधून माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, आशिष कचरूलाल जयस्वाल, चंद्रशेखर श्रीरामअप्पा उबाळे, विशाल राजेंद्र देशमुख, प्रभाग २ अ मधून निर्मला विजय पुंडगे, राणी अजय गायकवाड, कमलाबाई साहेबराव कांबळे, आशा मोहन उबाळे, आरती सतीश भंडारे, प्रभाग २ ब मधून प्यारेवाले बुऱ्हान शेख मुन्नू, यादव ब्रिजलाल नंदलाल, पाईकराव अमोल प्रकाश, प्यारेवाले हमीद पिरू, प्यारेवाले अक्रम भुरे, भगत विशाल जगन-लाल, प्रभाग ३ अ मधून गुठ्ठे अनिता उमेश, चौधरी करूणा राधेशाम, पाटील वृषाली उल्हास, होकर्णे नंदिनी शिवानंदअप्पा, यादव रोहीणी सागर, प्रभाग ३ ब मधून नायक नरसिंग विश्वासराव, शहाणे कैलास सुर्यकांत, पठाण नहीदखाँ जानीखाँ, पठाण फरोज-खान युसुफखान, बायस धिरजसिंह रणजीतसिंह, पठाण शाहीदखान मुजफर खान, प्रभाग ४ अ मधून गोटे वैशाली राजेश, पठाण अमीना उमरखान, गहिलोत मंगलादेवी शंभूसिंग, प्रभाग ४ ब मधून शाहु जितसिंग अर्जूनसिंग, नैनवाणी अनिलकुमार राजकुमार, गहिलोत शंभुसिंह विजयसिंह, पठाण असिमखान नासरखान, वडकुते सुरज कोंडबाराव, प्रभाग ५ अ मूधन वाढवे ज्योती शिरीष, इंगळे वंदना कृष्णा, सुर्यतळ अनिता सदाशिव, बलखंडे ज्योती सुखदेव, नरवाडे मयुरी योगेश, तपासे अरूणाबाई दलीतकुमार, प्रभाग ५ ब मधून शेख अकील शब्बीर, पठाण अनवर खान रहेमान खान, दुधडकर विशाल शिवशंकर, पठाण कय्युम खान मस्तान खान, पठाण फेरोज खान युसुफ खान, खंदारे मनोज शंकर, खुराणा वीणा जगजीतराज, प्रभाग ६ अ मधून पाटील मीना देवराव, माने चंद्रकला शामराव, लुंगे वसंताबाई पांडुरंग, शेख मोहसिनाबेगम ता-हेर, प्रभाग ६ ब मधून शेख जुबेर युसुफ, दुबे केशव जयप्रकाश, राठोड सुनील सुभाष, पठाण कलीम खान खलील खान, सय्यद आमेरअली मीर मसुद अली, पठाडे शुक्लोधन काशीराम, खंदारे अभिजीत दिलीप, प्रभाग ७ अ मधून पठाण नसीमबेगम हमीद खान, दुल्हा जावेद जाकीर, पठाण साजीया आवेसखान, सराफ रितीका सराफ सुरेशअप्पा, प्रभाग ७ ब मधून दुबे सुमन गोपाल, बगडीया नीता मनीष, शेख निखत बानो नफीस, शेख आयशिया बेगम आरेफ, पठाण शमीर बेगम गफारखान, प्रभाग ८ अ मधून चौधरी सुरभी भरत, शेख समरीन तब्बसुम मोहम्मद साजीद, राठोड आश्विनी नितीन, प्रभाग ८ ब मधून बाहेती प्रशांत दिलीप, खंडेलवाल कपील जुगलकिशोर, जयस्वाल अंकुश शरद, मुदीराज शुभम राम, कुरील लखन फकीरचंद, प्रभाग ९ अ मधून लव्हाळे इंदुबाई नंदकुमार, कुटे ज्योती प्रमोद, प्रभाग ९ ब मधून बागवान अब्दुल माबुद शिकुर, काळे विजय राजु, वाघ प्रणय दिपक, प्रभाग १० अ मधून बांगर श्रीराम लक्ष्मण, बांगर साई शिव-ाजी, प्रभाग १० ब मधून गोटरे सोनाली विशाल, श्रीनाथ गीताबाई कचरू, प्रभाग ११ अ मधून बनसोडे लिंबाजी संभाजी, लांडगे पंचफुलाबाई नारायणराव, वाढे रवींद्र तुकाराम, बोरकर श्रीकांत किशनराव, साबळे संतोष दशरथ, प्रभाग ११ ब मधून बांगर अरूणा पांडुरंग, बागर सुनीता गणेश, जयस्वाल समिता सचिन, शेख फरीदाबी इमरान, बोलोलु अश्लेषा रवी, पठाण सईदा बेगम सत्तार, कानवाळे चंद्रकलाबाई सुभाष, बांगर कुसुमबाई मोतीराम, प्रभाग १२ अ मधून बांगर सुभाष नारायणराव, बांगर विश्व-ासराव दगडुजी, बांगर माधव दत्ताराव, प्रभाग १२ ब मधून बांगर ज्योती रामकिशन, कल्पना सचिन बांगर, बांगर आश्विनी माधवराव, प्रभाग १३ मधून मोहम्मद रूबीना वाजीद, सय्यद सय्यदा आफरीन फिरदोस नासेर अली, प्रभाग १३ ब मधून शेख निहाल हाजी इस्माईल, सय्यद फहेद अली सय्यद सादीक अली, प्रभाग १४ अ मधून शेख अंजूम बेगम शेख मुजीब, शेख समरीन शमी शेख, शेख साहेराबेगम आजम, प्रभाग १४ ब मधून सय्यद जुनेद सय्यद खलील, हाशमी स बासीत हाशमी स हबीब, धुळे आनंदा राजाराम, बागवान शेख मुन्तजीब शेख मौला, शेख सद्दाम हुसेन खमर शेख, प्रभाग १५ अ मधून कांबळे सुमीत दत्तराव, भुक्तर सुनील राजकुमार, खंदारे कौसाबाई बाबाराव, पाईकराव किरण विजयराव, उरेवार भगवान गणपत प्रभाग १५ ब मधून बांगर शशीकलाबाई माधवराव, सय्यद करीमुनीसा शमशोद्दीन, जाधव रंजना बाबुराव, बागवान जिनतबेगम शेख आरीफ, आबेदा बेगम शेख बशीरोद्दीन प्रभाग १६ अ मधून गोरे निधी संजय, मेटकर रंगुबाई मारोती, प्रभाग १६ ब मधून कदम शाम अंबादासराव, बांगर धनंजय शिवाजी प्रभाग १७ अ मधून कुरेशी साद अहेमद मो अब्दुल कुद्दुस, सय्यद जावेद बाबु, बेग वाजीद मुसा, प्रभाग १७ ब मधून पठाण नाजीया परवीन अफरोज, शेख नजीमा बेगम शकील शेख, शेख मेहनाज फातीमा अतीक, पठाण नाजीया परवीन जुबेर खान, शेख शफी शेख गुलाम हे निवडणुक रिंगणात आहेत.




आता खऱ्या अर्थाने निवडणुकीच्या प्रचाराला वेग येणार असून महायुतीतील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीने नगराध्यक्षपदासाठी उमेदवार निवडणुक रिगणात उतरवले आहेत तर दुसरीकडे महाविकास आघाडीच्या अर्चना भिसे या एकमेव नगराध्यक्षपदाच्या निवडणुक रिंगणात आहेत.

## ऐन निवडणुक काळात भाजपच्या तीन उमेदवारांची माघार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ नोव्हेंबर**

हिंगोली नगर पालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि शिंदेसेना यांच्यात चांगलाच राजकीय संघर्ष निर्माण झाला असून भाजपच्या तीन उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतल्याने चर्चेला उधाण आले आहे. तसेच भाजपमधील काही पदाधिकारीही शिंदे सेनेच्या गळाला लागल्यामुळे भाजपला आत्मचिंतनाची गरज असल्याचे बोलले जात आहे.

हिंगोली नगर पालिकेत महायुतीतील भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात चांगलाच राजकीय संघर्ष पहायला मिळत आहे. भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांनी प्रचाराची धुरा सांभाळली आहे. तर शिवसेनेकडून कळमनुरीचे आ. संतोष बांगर, माजी सभापती श्रीराम बांगर तसेच युवासेना जिल्हाध्यक्ष राम कदम यांनी प्रचाराची धुरा हाती घेतली आहे.

हिंगोली नगर पालिकेत भाजप आणि शिवसेना शिंदे गटात आरोप प्रत्यारोपाच्या फैरी, एकमेकांचे उमेदवार पळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू झाले आहेत. दि २० रोजी भाजपचे उमेदवार भास्कर बांगर, विजय पाटील आणि दि २१ रोजी गजानन सोनुळे यांनी उमेदवारी मागे घेतल्यामुळे भाजपमध्ये एकच खळबळ उडाली आहे. तसेच भाजपचे शाम खंडेलवाल, दिनेश बगडीया यांच्यासह काही पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे हिंगोलीत भाजपच्याच नगराध्यक्षपदाचा उमेदवार विजयी होणार असल्याचा दावा करीत आहेत. शहरात शिंदेसेना मतदारांना आमिष दाखवित आहेत. आमच्या दोन्ही उमेदवारांना त्यांनी आमिष दाखविल्याचा आरोप केला आहे. हिंगोलीची जनता सुज्ञ असून आम्ही मागील काळात केलेल्या विकासाच्या कामावरच आमचा नगराध्यक्षपदाचा उमेदवार विजयी होणार असल्याचा दावा केला आहे. भाजपकडून नगराध्यक्षपदासाठी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांच्या पत्नी नीता बांगर, शिवसेनकडून रेखा श्रीराम बांगर, महाविकास आघाडीकडून उबाठा शिवसेनेच्या अर्चना श्रीराम भिसे यांच्यात तिरंगी लढत होणार असून हिंगोलीकर सर्व राजकीय घडामोडीवर बारकाईने लक्ष ठेवून असून येत्या काळात निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार असल्याचे दिसत आहे.




**हिंगोली– नगर पालिका निवडणुकीतून उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी येथील उपविभागीय कार्यालयासमोर उमेदवारांनी व त्यांच्या समर्थकांनी मोठी गर्दी केली होती. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### पुंडलीकराव झाडे खुडजकर यांचे निधन



हिंगोली– येथील देवडा नगर भागातील पुंडलिकराव नाम देवराव झाडे खुडजकर यांचे गुरुवारी दुपारी वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. येथील नगर पालिकेत पुंडलीकराव झाडे यांनी दीर्घकाळ सेवा केले. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी अनेक धार्मिक आणि सामाजिक कार्यात उल्लेखनीय काम केले. देवडा नगर भागातील विठ्ठल रूख्मीनीच्या मंदिर बांधकामात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. वारकरी संप्रदायाचे ते पुरस्कर्ते होते. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सकाळी १० वाजता हिंगोली येथील खाकी बाबा मठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी यांच्यासह मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या पश्चात एक मुलगी, दोन मुले, सुना नातू असा मोठा परिवार आहे. पत्रकार तुकाराम झाडे यांचे ते मोठे बंधू होत गजानन झाडे यांचे ते वडील होत.

### उमेदवारासोबत फिरल्यामुळे पोलिसाचे निलंबन

हिंगोली– हिंगोली नगर पालिका निवडणुकी राजकीय पक्षाच्या उमेदवारासोबत प्रचारासाठी फिरल्याच्या कारणावरून स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस कर्मचारी बालाजी गुंडे यांना पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी निलंबीत केले आहे. यासंदर्भात एका राजकीय पक्षाच्या उमेदवारासोबतचे छायाचित्र आणि तक्रार पोलिस अधीक्षक कार्यालयाकडे प्राप्त झाली होती. त्यानुसार तक्रारीची चौकशी सुरू करण्यात आली असून सदर चौकशी पूर्ण होईपर्यंत पोलिस कर्मचारी बालाजी गुंडे यांना निलंबीत करण्यात आले आहे. या कारवाईमुळे पोलिस दलात एकच खळबळ उडाली आहे.

### वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड राजेंद्र साखरे

वसमत– वकील संघाच्या २०२५–२७ कार्यकाळासाठी निवडणूक शांततेत पार पडली. अध्यक्षपदी ॲड. राजेंद्र साखरे, उपाध्यक्षपदी ॲड. शेख मोसिन, सचिवपदी ॲड. दीपक मुरंबेकर यांची निवड झाली. तर कोषाध्यक्षपदी ॲड. नाहीद सिद्दीकी, सहसचिव ॲड. केतनकुमार सारंग, ग्रंथालय सचिव ॲड. विनोद खोत आणि महिला प्रतिनिधी ॲड. साक्षी जोशी यांची बिनविरोध निवड झाली आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी निवडणूक अधिकारी ॲड. वाय. के. देलमाडे यांनी जबाबदारी सांभाळली. सहाय्यक अधिकारी ॲड. विश्वास सत्यविजय अनवेकर आणि ॲड. दीपक गुंडले यांचे सहकार्य लाभले.

### १५ वाहन चालकांवर पोलिसांची कारवाई

हिंगोली– अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १५ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी कारवाई करीत त्यांच्याकडून ११ हजार ५०० रूपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे तसेच दोन ठिकाणी जुगार अड्ड्यावर छापा मारून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## मुख्याध्यापक संघाकडून शिक्षणाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ नोव्हेंबर**

हिंगोली जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघातर्फे नुकताच पदभार स्वीकारलेल्या शिक्षणाधिकारी माध्यमिक आसावरी काळे यांचा सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे व सचिव विठ्ठल सोळंके यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

यावेळी शिक्षणाधिकारी काळे यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. यामध्ये दरमहिन्याचा पगार १ तारखेला करावा, संच मान्यतेमध्ये पदे मंजुर असतांना शालार्थमध्ये नाहीत या मुद्दयावर कोणत्याही कर्मचाऱ्याचे वेतन थांबविण्यात येऊ नये, शिक्षक, शिक्षकेत्तर रिक्त पदे तातडीने भरावेत, भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या तत्काळ देण्यात याव्यात, मुख्याध्यापक संघाची दरमहिन्याला बैठक लावण्यात यावी आदी मागण्यांचा समावेश आहे. याप्रसंगी प्राचार्य बाबासाहेब इंगोले, प्राचार्य गजानन वैद्य, मुख्याध्यापक नितीन अवचार, प्राचार्य अमर मोरे, मुख्याध्यापक माधव जाधव, मुख्याध्यापक विष्णू राठोड, मुख्याध्यापक कोरडे, शिक्षकेतर संघटनेचे जिल्हाध्यक्ष गोपालराव सरनाईक तसेच जिल्ह्यातील विविध माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य व मुख्याध्यापक यांची उपस्थिती होती.

## मोटार वाहन निरीक्षकाला टिप्पर मालकाची दमदाटी, गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ नोव्हेंबर**

औंढा नागनाथ ते जिंतुर मार्गावर गोळेगाव शिवारात एका टिप्पर मालकाने चलन फाडण्याच्या कारणावरून उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या मोटार वाहन निरीक्षकाला दमदाटी केल्याप्रकरणी औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिंगोली जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून अवैधरित्या वाळूची वाहतुक केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या संदर्भात पोलिस विभाग व महसुल विभागाकडून कारवाई केल्यानंतरही मध्यरात्री व पहाटेच्या सुमारास अवैध वाळू वाहतुक केली जात असल्याचे दिसत आहे. हिंगोली शहरात खटकाळी बायपास, समगा रोड तसेच औंढा नागनाथ तालुक्यातील वाळू घाटावरून मोठ्या प्रमाणावर वाळूचा उपसा करून त्याची वाहतुक केली जात आहे.

हिंगोली जिल्ह्यात सध्या नगर पालिका निवडणुका असून या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वाहनांची तपासणी करण्यासाठी पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकाने औंढा नागनाथ तालुक्यात मागील दोन दिवसांत अवैध वाळू वाहतुक करणाऱ्या टिप्परची धरपकड सुरू केली आहे. आतापर्यंत जवळपास चार ट्रॅक्टर पकडण्यात आले आहेत. परंतु वाळू माफीया मध्यरात्री व पहाटेच्या सुमारास अवैध वाळू वाहतुक करीत आहेत. यातील वाळू माफीया कोणत्या ना कोणत्या राजकीय पुढाऱ्याच्या भरोशावर आहेत.

बुधवारी दि १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी उपप्रादशिक परिवहन कार्यालयाचे वाहन निरीक्षक चंद्रकिर्ती टिपले हे कार्यालयाच्या भरारी पथकात कार्यरत असतांना औंढा ते जिंतुर मार्गावर वाहनांची तपाणी करीत असतांना एक टिप्पर थांबविले. चालक व मालकाकडे कागदपत्रे मागितले असता त्यांनी कागदपत्रे दाखविली नाही. उलटर टिप्पर मालक अली याने तुम्ही माझ्या टिप्परला चलन का मारले अशी विचारणा करीत कामात अडथळा निर्माण करीत दमदाटी केली. याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गोळेगाव येथे विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या नागरिकांसाठी शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ नोव्हेंबर**



औंढा नागनाथ तालुक्यातील गोळेगाव येथे विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील नागरिकांना विविध प्रमाणपत्रे व विविध योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी शुक्रवारी २१ नोव्हेंबर रोजी सकाळी अकरा वाजता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव, ज्ञानेश्वर सा-तपुते अशासकीय सदस्य उपस्थित होते.

विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा यासाठी गोळेगाव येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये संजय गांधी निराधार योजना, घरकुल योजना, निवडणूक विभाग, सेतू सुविधा केंद्र, आरोग्य विभाग, पुरवठा विभाग,ग्रामपंचायत विविध योजनांचे विभाग, पंचायत समिती मधील विविध योजनेचे विभाग यांचे या शिबिरात स्टॉल लावण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन नायबतहसीलदार वैजनाथ भालेराव यांच्या हस्ते झाले. औंढा नागनाथ तालुक्यातील गोळेगाव येथे विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा,तसेच विविध प्रमाणपत्रे नागरिकांना या शिबिरात वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन अमोल तामसकर आभार आशा गीते यांनी मानले.

## फेन्सिंग राज्यस्तरीय स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडूंचा हिंगोलीत सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ नोव्हेंबर**



छत्रपती संभाजीनगर दि.१२ ते १४ नोव्हेंबर रोजी विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा येथे पार पडलेल्या शालेय राज्यस्तरीय फेन्सिंग (तलवारबाजी) स्पर्धेत उत्कृष्ट यश संपादन केलेल्या हिंगोली जिल्ह्यातील खेळाडूंचा सत्कार हिंगोली जिल्हा फेन्सिंग असोसिएशनच्या वतीने करण्यात आला.

या स्पर्धेमध्ये १७ वर्षातील मुलींच्या सेबर गटात कु. सेजल रायलवार हिने ब्रॉन्झ मेडल मिळवले. त्याच शाळेतील खेळाडू ओजस वाघ यांनी १४ वर्षांखालील मुलांच्या सेबर प्रकारात सुवर्णपदक पटकावले. तसेच कु.आर्या मिसाळ हिने १४ वर्षातील मुलींच्या सेबर प्रकारात ब्रॉन्झ मेडल मिळवून जिल्ह्याचे नाव उज्वल केले. या सर्व विजेत्या खेळाडूंचा सत्कार हिंगोली जिल्हा फेन्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष कल्याण देशमुख, प्राचार्य पवन सोळंके, तसेच संघटनेचे सचिव संजय भुमरे यांच्या हस्ते करण्यात आला. अध्यक्ष कल्याण देशमुख यांनी तिन्ही खेळाडूंना पुढील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी शुभेच्छा देत त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. या कार्यक्रमाला संघटनेचे पदाधिकारी प्रा.नरेंद्र रायलवार, राष्ट्रीय फेन्सिंग खेळाडू संदीप वाघ, वनपाल गणेश मिसाळ, प्रशिक्षक बजरंग कदम व इतर खेळाडू उपस्थित होते. या यशामुळे जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून फेन्सिंग क्रीडा क्षेत्रात हिंगोलीच्या खेळाडूंनी दमदार उपस्थिती दर्शविली आहे.

# पोषण आहार योजनेतील गंभीर अनियमितता?; कागदावर 'पौष्टिक', प्रत्यक्षात पिवळा भात

तभा, वृत्तसंस्था
बीड : प्रतिनिधी

बालकांमध्ये कुपोषण टाळण्यासाठी शासनाने महिला व बालकल्याण विभागामार्फत पोषण आहार योजना राबवली आहे. शासन परिपत्रकानुसार अंगणवाड्यांमध्ये मुलांना ऊर्जा-वर्धक, प्रथिनयुक्त आणि विविध पदार्थांचा पौष्टिक आहार देणे अनिवार्य आहे. परंतु बीड शहरातील अनेक केंद्रांमध्ये कागदावरील आहार यादी आणि प्रत्यक्ष दिल्या जाणाऱ्या अन्नपदार्थात गंभीर विसंगती असल्याचे स्थानिक नागरिकांच्या पाहणीतून समोर येत आहे.

मुलं पौस्टिक होण्या ऐवजी 'यावर संस्था व आणि अधिकारीच पौस्टिक झाल्याचे ?

'कुपोषण टाळण्यासाठी ही योजना सुरू झाली असताना प्रत्यक्षात 'पौष्टिक' हा शब्द आहारासाठी नव्हे तर पुरवठादार संस्था व संबंधित अधिकाऱ्यांच्या नावालाच लागू होत असल्याचे चित्र दिसते; आणि ज्या मुलांना कुपोषणापासून वाचवण्यासाठी ही योजना आहे, तीच मुले पुन्हा कुपोषणाच्या धोक्याला सामोरी जात आहेत.' मुलांच्या वाढीच्या निर्णायक वयात पौष्टिक आहार न मिळाल्यास मानसिक व शारीरिक विकासावर गंभीर परिणाम होतो, अशी तज्ज्ञांची इशारे आहेत.

घोटाळ्यासदृश परिस्थितीची शक्यता?

'आहाराच्या गुणवत्तेतील गंभीर घटी, नोंदीतील तफावत आणि प्रत्यक्ष पुरवठ्यात दिसून येणाऱ्या विसंगती पाहता, या संपूर्ण प्रक्रियेत घोटाळ्यासदृश परिस्थिती निर्माण झाल्याची शक्यता स्पष्टपणे जाणवते.'

हा शब्दप्रयोग थेट आरोप टाळत असला तरी परिस्थितीची भीषणता अधोरेखित करतो.

### कागदावर पौष्टिक पदार्थ, प्रत्यक्षात पिवळा भाताची खिचडी

शासन नियमावलीनुसार मुलांना तांदूळ, डाळ, गूळ, भाज्या, पोषणमिश्रण, फळे/अंडी केळी इत्यादी पदार्थांचे नियमित वितरण करणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्ष स्थितीत फक्त पिवळ्या भाताची खिचडी देऊन संपूर्ण आहार पूर्ण झाल्याचे दाखवणे, गुणवत्ताविहीन साहित्य,वजनातील तफावत नोंदी आणि पुरवठा यात गंभीर त्रुटींलह, अशा अनेक त्रुटी निदर्शनास येत आहेत.



### नागरिकांकडून चौकशीची तातडीची मागणी

ही गंभीर बाब लक्षात घेता सजग नागरिकांनी प्रत्यक्ष पाहणी, पुरवठादार संस्थांचे ऑडिट, आहार नोंदींची पडताळणी, मुलांना दिल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष आहाराची तपासणी करण्याची मागणी जिल्हा प्रशासन, महिला व बालकल्याण विभाग आणि निरीक्षण यंत्रणेपुढे ठेवली आहे.

–रामनाथ खोड

### यंत्रणेचे दुर्लक्ष? नियमांचे उघड अपालन?

पोषण आहारात वापरण्यात येणाऱ्या वस्तूंची गुणवत्ता तपासणी, पुरवठा नोंदींची पडताळणी, स्टॉक नोंदींचे अँटी-डायवर्जन निरीक्षण, पुरवठादारांची पात्रता चाचणी हे सर्व शासनाने अनिवार्य केले आहे. तरीदेखील प्रत्यक्ष अंमलबजावणी अत्यंत दुबळी असून, साहित्य पुरवठा करणाऱ्या नामधारी संस्थांची पारदर्शकता, नोंदी व प्रत्यक्ष साहित्य यात मोठी दरी दिसून येते.

### यंत्रणेचे दुर्लक्ष? नियमांचे उघड अपालन?

पोषण आहारात वापरण्यात येणाऱ्या वस्तूंची गुणवत्ता तपासणी, पुरवठा नोंदींची पडताळणी, स्टॉक नोंदींचे अँटी-डायवर्जन निरीक्षण, पुरवठादारांची पात्रता चाचणी हे सर्व शासनाने अनिवार्य केले आहे. तरीदेखील प्रत्यक्ष अंमलबजावणी अत्यंत दुबळी असून, साहित्य पुरवठा करणाऱ्या नामधारी संस्थांची पारदर्शकता, नोंदी व प्रत्यक्ष साहित्य यात मोठी दरी दिसून येते.

# लोकविकास महाआघाडीची अंबाजोगाई त जोरदार मुसंडी

## राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांना उदंड प्रतिसाद



तभा वृत्तसेवा

अंबाजोगाई : अंबाजोगाई नगर परिषद पंचवार्षिक निवडणूकीच्या प्रचारार्थ अंबाजोगाई शहरात फिरत असलेल्या लोकविकास महाआघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी व त्यांचे १५ प्रभागातील ३१ शिलेदार यांना त्यांच्या प्रचारादरम्यान अंबाजोगाई शहरवासीयांकडून उदंड असा प्रतिसाद पहायला मिळत असल्याचे पहावयास मिळत आहे.यावरून लोकविकास महाआघाडीने अंबाजोगाई शहरात प्रचारात जोरदार मुसंडी मारल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.

नगर परिषदेच्या निवडणूकिसाठी स्थानिक पातळीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार याची युती होऊन लोकविकास महाआघाडी निर्माण करण्यात आली. त्यानंतर या महाआघाडीला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे), समाजवादी पार्टी ऑफ इंडिया या समविचारी पक्षांचा बिनशर्त असा जाहीर पाठींबा व्यक्त करण्यात आला. या विविध पक्षांच्या पाठिंब्यामुळे लोकविकास महा आघाडीचे पारडे जड झाल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

लोकविकास महाआघाडीचे उमेदवार राजकिशोर मोदी व त्यांचे सहकारी मोईन भाई व रौफ बिल्डर यांनी प्रभाग १२ मध्ये जोरदार अशी प्रचार रॅली आयोजित केली होती. या प्रचार रॅलीमध्ये सदर बाजार, पेन्शन पुरा, मियाभाई कॉलनी, मोची गल्ली, शिंपी गल्ली, भोई गल्ली, आदी परिसरात या प्रभागातील प्रत्येक मतदारांच्या घरोघरी जाऊन त्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधत होते. तेथील नागरिक देखील राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांचे उत्स्फूर्त असे स्वागत करत होते. यावरून अंबाजोगाई नगर परिषदेसाठी स्थानिक पातळीवर निर्माण झालेल्या लोकविकास महा आघाडीवर किती मोठया प्रमाणावर विश्वास दाखवत असल्याचे चित्र स्पष्ट दिसत होते.

# संक्षिप्त वृत्त...!



बीड : दादा महाराज यांच्या समाधी सोहळा संपन्न झाला ,श्री क्षेत्र रामतिर्थ मठ येथे ,श्री विध्यागुरू महाराज यांच्या हस्ते व दादा महाराज यांच्या शिष्य परिवार यांच्या हास्ते महा रूद्र आभिषेक व आरती संपन्न झाली , व श्री आणिल महाराज यांचे काल्या चे किर्तन झाले ,या उपस्थित श्री श्री १००८ महामंडलेश्वर महाराज ,व श्री रामचंद्र तडवळेकर ,श्री आणिल सेठ चरखा ,विजय बजाज ,गोंविद सेठ ,बस्वंराज, माऊली ,संतोष, चांडक ,जाजू यांच्या हास्ते गुरुचरित्र व शिवपुरण कथची पुजा सांगता केली, बीड, परभणी, पुणे ,लातूर ,नांदेड, संभाजी नगर,सोलापूर ,मुंबई सह दादा महाराज यांचे शिष्य परीवार व परीसरातील भाविक भक्त मोठ्या संख्या ने उपस्थित होते, महाप्रसादा चा लाभ घेतला.

## DYFI युवा संघटनेच्या राज्य अधिवेशनास माजलगाव येथे जोरदार सुरुवात

### युवकांनी बेरोजगारीच्या प्रश्नावर तीव्र लढा उभा करावा- डॉ. अजित नवले




माजलगाव: डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडियाचे तीन दिवसीय महाराष्ट्र राज्य अधिवेशनाला दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी माजलगाव शहरात भव्य रॅली काढून सर्वांना शिक्षण सर्वांना काम मिळालंच पाहिजे.. युवा एकता जिंदाबाद अशा जोरदार घोषणांनी सुरुवात झाली. यानंतर DYFI राज्याध्यक्ष नंदू हाडळ यांच्या अध्यक्षतेखाली रॅलीचे रूपांतर जाहीर सभेत झाले. या सभेला संबोधित करण्यासाठी अधिवेशनाच्या स्वागत समितीचे अध्यक्ष प्रा.डॉ. मिलिंद आव्हाड, प्रमुख उपस्थिती डीवायएफआय चे राष्ट्रीय सचिव हेमंगराज भट्टाचार्य, त्याचबरोबर प्रमुख वक्ते म्हणून किसान सभेचे महाराष्ट्र राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी उपस्थित राज्य भरातून आलेल्या प्रतिनिधींना युवकांच्या समोरील आव्हाने व त्यावर युवा संघटनेची वाटचाल या विषयी संबोधित केले. जाहीर सभेचे प्रास्ताविक राज्य उपाध्यक्ष मोहन जाधव यांनी तर सूत्रसंचालन राज्य सचिव दत्ता चव्हाण यांनी केले. पुढील तीन दिवस DYFI ने मागील तीन वर्षांत केलेल्या कामांची चर्चा केली जाईल, पुढील लढ्याची दिशा ठरवली जाईल त्याच प्रमाणे पुढील काळासाठीची नवीन राज्य समिती लोकशाही पद्धतीने निवडली जाईल अशी माहिती DYFI चे राज्य सचिव दत्ता चव्हाण यांनी दिली.

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, वंचितचे नेते अमित भुईगळ यांच्या उपस्थितीत आज प्रचाराचा नारळ फुटणार

### काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी विजयाचे रणसिंग फुंकणार



परळी प्रतिनिधी : काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ तसेच वंचित बहुजन आघाडीचे राज्य कार्यकारणी सदस्य अमित भुईगळ यांच्या प्रमुख उपस्थितीत आज परळी नगरपरिषद निवडणुक प्रचाराचा नारळ फोडून भव्य शुभारंभ करण्यात येणार आहे. या प्रचार शुभारंभाच्या सभेतून काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी आपल्या विजयाचे रणसिंग फुंकणार असल्याची माहिती काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूरभाई व वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांनी दिली आहे. याबाबत प्रसिद्धी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, परळी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस वंचित बहुजन आघाडीच्या वतीने नगराध्यक्ष तसेच नगरसेवक पदांची निवडणूक लढविण्यात येत आहे. या निवडणूक प्रचाराचा शुभारंभ आज शनिवार,दिनांक २२ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी अकरा वाजता करण्यात येणार आहे. शहरातील मोंढा मार्केट येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रचार शुभारंभाच्या कार्यक्रमात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ , तसेच वंचित बहुजन आघाडीचे राज्य कार्यकारणी सदस्य अमित भुईगळ यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रचाराचा नारळ फोडण्यात येईल. या सभेला काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष शैलेशभाऊ कांबळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

# बीड जिल्हा भाजपा अध्यक्ष शंकर भाऊ देशमुख यांनी रात्री नऊ वाजता अतिशय थंडीमध्ये देखील दिले आरोग्यपत्र

तभा, वृत्तसंस्था
बीड प्रतिनिधी.

सध्या महाराष्ट्रामध्ये महायुतीचे सरकार आहे या महायुतीच्या सरकारमध्ये महाराष्ट्राला कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र जी फडणवीस साहेब हे लाभलेले आहेत त्याच अनुषंगाने बीड जिल्हा हा राजकीय क्षेत्रातील सर्वात मोठे केंद्रबिंदू म्हणून महाराष्ट्रामध्ये ओळखला जातो याकडे सर्व महाराष्ट्राचे राजकारणाच्या बाबतीत लक्ष असते याच बीड जिल्ह्याला भारतीय जनता पार्टीचे असे लोकप्रिय अध्यक्ष हे अमृततुल्य अध्यक्ष म्हणून सध्या ओळखले जाऊ लागले आहेत माननीय शंकर जी भाऊ देशमुख साहेब भारतीय जनता पार्टीला लाभलेले बीड जिल्हा अध्यक्ष हे खरोखर अमृततुल्य असे अध्यक्ष आहेत त्यांना रात्री नऊ वाजता फोन करून कळवले की आम्हाला एक आरोग्य संदर्भामध्ये एक पेशंट छत्रपती संभाजी नगरला अत्यंत मोठ्या आजारामध्ये त्रस्त अवस्थेमध्ये आहे त्यांना एक माननीय मुख्यमंत्री सहायता निधीसाठी लागणारे एक आपले मार्फत आरोग्य पत्र पाहिजे आहे यासंदर्भात महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे मा संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब यांनी कॉल केला असता लोकप्रिय व अमृततुल्य अध्यक्षांनी क्षणाचाही विचार न करता तात्काळ तुम्ही भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयामध्ये या आम्ही तुम्हाला तात्काळ तशा पद्धतीचे माननीय मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी आरोग्य पत्र देऊ असे आश्वासन दिले नंतर लगेचच आम्ही भारतीय जनता पार्टीचे कार्यालय बीड येथील माने कॉम्प्लेक्स परिसरामध्ये असलेल्या ठिकाणी गेलो त्या ठिकाणी भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष माननीय नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील हे उपस्थित होते तसेच त्यांच्या समवेत बीड जिल्हा शहर अध्यक्ष मा अशोक जी भाऊ लोढा साहेब हे देखील ऑफिसमध्ये उपस्थित होते तसेच भारतीय जनता पार्टीचे सोशल मीडिया अध्यक्ष मा अमोल जी वडतिले साहेब हे देखील उपस्थित होते यांनी सर्वांनी मिळून मा शंकर भाऊंना विनंती केली असता त्यांनी तात्काळ सर्वांच्या विनंतीला मान देऊन एक आरोग्य पत्र तयार करण्यासाठी आपल्या सहकाऱ्यांना सांगितल्याने सहकार्याने तात्काळ आरोग्यपत्र उपलब्ध करून देऊन शंकर भाऊ देशमुख यांनी तात्काळ त्याच्यावर सिग्नेचर केली व भाऊंना महत्त्वाचे काम असल्यामुळे ते त्या ठिकाणावरून कामासाठी बाहेर बीड शहरामध्ये गेले आणि हे आरोग्य पत्र देण्याचे आदेश त्यांनी आपल्या सहकार्याला दिले त्यांच्या आदेशावरून भारतीय जनता पार्टीचे नेते मा नवनाथ जी अण्णा शिरोळे पाटील यांनी व शहराध्यक्ष मा अशोक जी भाऊ लोढा साहेब तसेच सोशल मीडियाचे प्रसिद्ध प्रमुख अमोल वडतिले साहेब यांनी लोकशाही पत्रकार संघाचे मा संस्थापक अध्यक्ष यांच्या स्वाधीन हे आरोग्य पत्र केले यावेळी येथे उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर तसेच आदी सह उपस्थित होते हे आरोग्य पत्र दिल्यामुळे पेशंटच्या नातेवाईकांना भ्रमर धोनी वरून तशाप्रकारे कल्पना अक्षय पत्रकार संघाचे सर्वेसर्वा मा संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब यांनी दिली असता त्यांना अतिशय आनंद झाला आणि त्यांनी सध्या बीड जिल्ह्यामध्ये भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष करत असलेल्या उत्कृष्ट कर्तव्याच्या बाबतीत समाधान व्यक्त केले आणि त्यांनी मा शंकर जी भाऊ देशमुख साहेब यांचे आभार मानले आणि खरोखरच बीड जिल्ह्याला अतिशय उत्कृष्ट सुसंस्कृत आणि कुशल अभ्यासू असे अमृततुल्य भारतीय जनता पार्टीला शंकर भाऊ सारखे लोकप्रिय सर्वांच्या सुखदुःखामध्ये सातत्याने सहभागी होणारे सर्वांचे अडीअडचणी शासन प्रशासन दरबारी मांडून सोडून देणारे माननीय शंकर भाऊ देशमुख साहेब हे अध्यक्ष लाभल्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र नागरिकांमधून समाधान व्यक्त होत असल्याचे सध्या बोलले जात आहे आणि सध्या होत असलेल्या बीड नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये मा शंकर भाऊच्या कुशल प्रयत्न मुळे भारतीय जनता पार्टीचा झेंडा देखील बीड नगर परिषदेवर फडकेल असा विश्वास ही सर्व बीड शहरातील नागरिकांमधून व्यक्त होत आहे .




# ना.पंकजाताई मुंडे यांच्यामुळे नागापूर ग्रामपंचायतीला मिळणार नवीन इमारत ; २५ लाखाचा निधी मंजुर

तभा, वृत्तसंस्था

परळी वैजनाथ, २१ नोव्हेंबर : राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या शिफारशीमुळे तालुक्यातील नागापूर ग्रामपंचायतीला नवीन इमारत बांधकामसाठी २५ लाख रुपयाचा निधी मंजुर झाला असुन निधी मिळाल्याबद्दल सरपंच व ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले आहेत.

ज्या ग्रामपंचायतींना स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही अशा ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी शासनाकडून मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत निधी मंजुर करण्यात येत असतो. तालुक्यातील नागापूर ग्रामपंचायतीला स्वतंत्र इमारत असावी अशी ग्रामस्थांची गेल्या अनेक दिवसांपासुनची मागणी होती. या संदर्भात सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थांचे एक शिष्टमंडळ ना.पंकजाताई मुंडे यांना भेटले होते. त्याअनुषंगाने ना.पंकजाताई मुंडे यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना एक पत्र पाठवुन नागापूर ग्रामपंचायतीला इमारत बांधकामासाठी निधी मंजुर करावा अशी शिफारस केली होती. त्यानुसार ग्रामविकास मंत्रालयाने यासाठी २५ लाख रुपयाचा निधी मंजुर केला असुन त्याला प्रशासकीय मान्यता देखील प्रदान केली आहे. ग्राम पंचायतीला नवीन इमारत मंजुर करुन दिल्याबद्दल सरपंच, उपसपंच व ग्रामस्थांनी ना. पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

# बीड जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

तभा, वृत्तसंस्था

बीड, दि,२१, : बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत आगामी काळात दि. ०४ नोव्हेंबर २०२५ पासून नगरपालिका निवडणूक आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. तसेच विविध राजकीय पक्ष, संघटनेच्या वतीने न्याय मागण्यासाठी प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. ०१ डिसेंबर २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.

या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपणास्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समवेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील.

# जिल्ह्यातील ऊस दर प्रश्न पेटणार; सर्व शेतकरी संघटनांकडून बेमुदत चक्काजाम!

परळी / प्रतिनिधी : ऊसदर प्रश्नी जिल्ह्यातील सर्व शेतकरी संघटना एक होत आक्रमक पवित्रा घेत आहेत. जिल्ह्यातील माजलगाव या ठिकाणी दि २४ नोव्हेंबर रोजी ऊस दरासाठी होणाऱ्या अभूतपूर्व चक्काजाम आंदोलनात सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे व ऊसतोडी बंद ठेवून ऊसतोड व वाहतूक बांधवांनी सहकार्य करण्याचे व सभाव्य नुकसान टाळण्याचे आवाहन ऊस उत्पादक शेतकऱ्याच्या वतीने करण्यात आले आहे. दि २३ रोजी शेतकऱ्यांनी आपापल्या गावात टायर जाळून आपण सहभागी असल्याचा व यंत्रणांनी दखल घेण्याचा सुचक इशारा द्यावा. दि १९ नोव्हेंबर रोजी माजलगाव येथील बाजार समितीत जिल्हाभरातील सर्व शेतकरी संघटनांच्या कार्यकर्त्यांची व ऊस उत्पादक शेतकऱ्यांची बैठक झाली.

दीनदयाळ नागरी सहकारी बँक म., अंबाजोगाई | DNS Bank Ltd. Ambajogai
"दीनदयाळ भवन", परळी रोड, अंबाजोगाई. जि.बीड ४३१५१७. फोन-२४४६-२४६९२६/२७फॅक्स-२४४६-२४६९२७
जा.क्र.दीन.वसुली/सरफेसी/१३/परभणी/पीएलसी-१११/१८९/२०२५-२६ दिनांक २१.११.२०२५

वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षिततिकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकारी अंमलबजावणी ॲक्ट २००२ (२रा) च्या सेक्शन १३(४) नुसार ताबा सुचना

**ताबा सुचना**

प्रति,
१. श्री. गणेश रामदास उदावंत
पत्ताः-रामदास उदावंत, गवळी गल्ली, परभणी, ता.जि.परभणी-४३१ ४०१
२. श्री. दत्ता बाबुराव डहाळे
पत्ताः- नांदखेडा रोड, रंगनाथ महाराज नगर, परभणी, ता.जि. परभणी-४३१ ४०१
३. श्री. विजयकुमार मुरलीधर डहाळे,
पत्ताः- जाधव गॅस एजन्सी रोड, त्रिमुर्तीनगर, परभणी, ता.जि. परभणी-४३१ ४०१

**विषयः**-वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षित्तीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकार अंमलबजावणी ॲक्ट २००२ (२ रा) च्या सेक्शन १३(४) नुसार ताबा सुचना

**संदर्भः**-बँकेची डिमांड नोटीस क्र.SARFAESI/13/PLC-111/136/2025-26 दिनांक १८.०९.२०२५ अन्वये.

महोदय,
उपरोक्त संदर्भीय डिमांड नोटीस दिनांक १८.०९.२०२५ नुसार मी खालील सही करणार आपणास सुचित करीत आहे की ६० दिवसाची मुदत पुर्ण होवुन व वेळोवेळी आपणास थकीत कर्ज भरण्याची मुदत देवुन सुधा थकीत कर्ज रक्कम जमा न केल्यामुळे खालील प्रमाणे वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा कलम १३(४) अंतर्गत ताबा घेण्यात येईल.
करीता आपणास कळविण्यात येते की, दिनांक ०६.१२.२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजता (१५ दिवसांच्या आत) किंवा त्यानंतर बँकेच्या वेळेनुसार केव्हाही आपल्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी येत आहे. स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यास व पंचनामा तसेच इंव्हेन्टरी तयार करतांना सहकार्य करावे.
तसेच आपणास कळविण्यात येते की, वरील कार्यवाही करतांना आपण अथवा इतर कोणीही कुठल्याही प्रकारे कार्यवाही मध्ये अडथळे निर्माण केल्यास अथवा कार्यवाही थांबविण्याचा प्रयत्न केल्यास सदर्हु वर्तन हे फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील. कृपया नोंद घ्यावी.
**परिशिष्ठः-** मालमत्तेचे वर्णन
**(मालमत्ता धारकाचे नावः- गणेश रामदास उदावंत)**
गहाणदार/कर्जदार/जामीनदार तारण मालमत्ता परभणी शहर महानगरपालीका घर क्र.९९ वार्ड क्र. ५-अ, पी.आर.कार्ड क्र.७५९-१३५१५ क्षेत्रफळ पुर्व-दक्षिण भाग दक्षिण-उत्तरः ३० फु. (०९.१४ मी.)आणि पुर्व-पश्चिमः- १२.०६ फु. (०३.८१ मी.) एकुण क्षेत्रफळ ३४.८२ स्वे.मी. गवळी गल्ली, परभणी ज्यांच्या चतु:सिमा खालीलप्रमाणेः-
**पुर्वः-** शांताबाई भाऊराव यांचे घर
**पश्चिमः-**अंतर्गत रस्त्याच्या वापरासाठी संतोष रामदास उदावंत यांच्या मालमत्ता क्र.९९ पी.आर.कार्ड क्र.१३५१५चा काही भाग
**दक्षिणः-** संतोष रामदास उदावंत यांच्या मालमत्तेचा काही भाग
**उत्तरः-** सरकारी रस्ता
("वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत")

अधिकृत अधिकारी

दीनदयाळ नागरी सहकारी बँक म., अंबाजोगाई | DNS Bank Ltd. Ambajogai
"दीनदयाळ भवन", परळी रोड, अंबाजोगाई. जि.बीड ४३१५१७. फोन-२४४६-२४६९२६/२७फॅक्स-२४४६-२४६९२७
जा.क्र.दीन.वसुली/सरफेसी/०५/पालम/टीएल-१६५/१९०/२०२५-२६ दिनांक २१.११.२०२५

वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षिततिकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकारी अंमलबजावणी ॲक्ट २००२ (२रा) च्या सेक्शन १३(४) नुसार ताबा सुचना

**ताबा सुचना**

प्रति,
१. **मे. वैभव मार्केटींग प्रोप्रा. वैभव रमेश शिनगारे (कर्जदार)**
**पत्ताः-** मु.पो.पेठशिवणी, ता.पालम, जि.परभणी ४३१ ७२०
२. **श्री. रमेश शेषेराव शिनगारे (सह-कर्जदार)**
**पत्ताः-**मु.पो. पेठशिवणी, ता.पालम,जि. परभणी ४३१ ७२०
३. **श्री. अजय रमेश शिनगारे (सह-कर्जदार)**
**पत्ताः-** मु.पो.पेठशिवणी, ता.पालम,जि. परभणी ४३१ ७२०
४. **श्री. विजय मारोती जोशी**
**पत्ताः-** संभाजी नगर, कंधार, ता.कंधार,जि.नांदेड ४३१ ७१४
५. **ज्युलीया सॅमसन सायलस**
**पत्ताः-** पुष्प नगर, पावडेवाडी नाका, नांदेड, ता.जि. नांदेड ४३१ ६०१
६. **श्री. गंगाधर साहेबराव पारवे**
**पत्ताः-** गौर, ता.पुर्णा,जि.परभणी ४३१ ५११

**विषयः**-वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षित्तीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकार अंमलबजावणी ॲक्ट २००२ (२ रा) च्या सेक्शन १३(४) नुसार ताबा सुचना

**संदर्भः-** बँकेची डिमांड नोटीस क्र.Ref.No.SARFAESI/05/TL-165/137/2025-26 दिनांक १८.०९.२०२५अन्वये.

महोदय,
उपरोक्त संदर्भीय डिमांड नोटीस दिनांक १८.०९.२०२५ नुसार मी खालील सही करणार आपणास सुचित करीत आहे की ६० दिवसाची मुदत पुर्ण होवुन व वेळोवेळी आपणास थकीत कर्ज भरण्याची मुदत देवुन सुधा थकीत कर्ज रक्कम जमा न केल्यामुळे खालील प्रमाणे वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा कलम १३(४) अंतर्गत ताबा घेण्यात येईल.
करीता आपणास कळविण्यात येते की, दिनांक ०६.१२.२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजता (१५ दिवसांच्या आत) किंवा त्यानंतर बँकेच्या वेळेनुसार केव्हाही आपल्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी येत आहे. स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यास व पंचनामा तसेच इंव्हेन्टरी तयार करतांना सहकार्य करावे.
तसेच आपणास कळविण्यात येते की, वरील कार्यवाही करतांना आपण अथवा इतर कोणीही कुठल्याही प्रकारे कार्यवाही मध्ये अडथळे निर्माण केल्यास अथवा कार्यवाही थांबविण्याचा प्रयत्न केल्यास सदर्हु वर्तन हे फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील. कृपया नोंद घ्यावी.
**परिशिष्ठः-** मालमत्तेचे वर्णन
**(मालमत्ता धारकाचे नावः-**वैभव रमेश शिनगारे)
**मौजे पेठशिवणी ता.पालम जि.परभणी येथील ग्रामपंचायत घर क्र.६९३ क्षेत्र पुर्व पश्चिम ६० फु. दक्षिण उत्तर १० फु. एकुण ६०० स्वे.फु. खुला प्लॉट आणि टिन शेड ज्यांच्या चतुःसिमा खालीलप्रमाणेः-**
**पुर्वः-** शिवानंद कोंडापुरे यांचे शेड
**पश्चिमः-** सुभाष टोने यांचा प्लॉट
**दक्षिणः-**राजेश्वर कारंजे यांचा प्लॉट
**उत्तरः-** लोहा - गंगाखेड रोड
("वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत")

अधिकृत अधिकारी